# रक्त नि शाई

आज-कालच्या जीवनाचीं गेय शब्द-चित्रें

पारिजात प्रकाशन-१५

रघुवीर सामंत

आजची गाणीं—२

# —रक्त....नि....शाई—

[आज कालच्या जीवनाची]
गेय शब्द-चित्रें

—रघुवीर सामंत—

[२४ डिसेंबर १९४७]

—पारिजात प्रकाशन—

रघुनाथ ज. सामंत बी. ए. बी. टी.
यांनी
'सागर साहित्य छापखाना'
त्रिभुवन रोड, मुंबई ४
येथें मुद्रित करून
'पारिजात प्रकाशन'
१४ बी, हरजीवनदास एस्टेट
व्हिन्सेन्ट रोड, दादर, मुंबई १४
येथें प्रसिद्ध केलें.

★ * ★

पारिजात प्रकाशन-१५
प्र थ मा वृ त्ति
२४ डिसेंबर १९४७
मूल्य-रु. १॥

★

[ पुनर्मुद्रण, उद्धृतीकरण, प्रकट वाचन, ध्वनि-मुद्रण, ध्वनि-क्षेपन, नाट्यीकरण, चित्रीकरण इत्यादि व इतर सर्व हक्क ग्रंथकर्त्याकडे. ]

★

## रघुवीर सामंत
### यांच्या
### — प्रकाशित विविध कलाकृती —

१*हृदय --- [शद्बचित्रें-कथा] -१२-१९३२-
२*वाळूंतील पावलें-[विविध कथा]-१२-१९३४-
३ सुरंगीची वेणी-[रूपांतरितकथा]-१२-१९३५-
४ आजची गाणीं-[ कविता ]--८-१९३९-
५*पणत्या— [ लघुनिबंध ]-१०-१९३९-
६*मासलेवाईक प्राणी-[स्वभावचित्रें]-१०-१९४०-
७ तारांगण — [नवे लघुनिबंध]-१२-१९४०-
८ रजःकण— [कथा-निबंध] १२-१९४१-
९ आदर्श कृषीवल-[ चरित्र ]-१२-१९४५-
१० तांडा— [ कथा ]-१२-१९४६-
११ रक्त...नि...शाई-[ कविता ]-१२-१९४७-

[* खुणेच्या पुस्तकांच्या पहिल्या आवृत्त्या संपल्या अगर संपत आल्या असून दुसऱ्या आवृत्त्या निघाल्या आहेत अगर प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. ]

## रघुवीर सामंत
### यांच्या
### प्रकाशित कादंबऱ्या

१२*प्रवासांतील सोबती [पत्रात्मक, खंड-१] ३-१९३८-
१३*अभ्र-पटल- [कथनात्मक; खंड-२]-६-१९३८-
१४*आकाश-गंगा-[संमिश्र; खंड-३]-१२-१९३९-
१५*घरोघरच्या देवी-[नाट्यात्मक. खंड-४]
-१२-१९४४-
[आंतील पान ६८ वरील 'उपकारी माणसें' पहा]
१६ जीवन-गंगा [काहूर] [मनोविश्लेषक]-४-१९४७-
*प्रती संपत आल्या आहेत.

### —आगामी कलाकृति—

१†पाण्यावरल्या रेघा. [कथा]
२†चिमण्या जगाचे नेते- [कादंबरी]
३ आम्हांला जगायचं आहे! [कादंबरी]
४†कान-गोष्टी [लघुनिबंध]
५ जिवंत माणूस! [कादंबरी]
६†एकेक आठवण- [रम्य स्मृति]

†जून १९४८ पर्यंत प्रकाशीत होतील.

## ~रक्त....नि....शाई~

[अनुक्रम]


आकाश-वाणी! [१-६]
समर्पण [७]
१ भाऊ, तयार व्हा!- [९-१३]
२ 'जगेन!' म्हणतो- [१५-१८]
३ प्रचंड आहुती- [१९-४०]
४ सातसागरापल्याड- [४१-५१]
५ सत्ताधीश- [५३-५९]
६ अंधार!-कां अंधार?- [६१-६७]
७ लखलखते लाख दीप- [६९-७२]
८ उद्यां नाय! आज!- [७३-७६]
९ विश्वनाथाचा अवतार-[७७-९२]
१० भस्मासुराचा अवतार-[९३-१०६]
११ आंधळ्यांची माळ- [१०७-१२२]
१२ रक्त...नि...शाई— [१२३-१३३]
—विश्रांति—


{ क्षमस्व-अनवधान व यांत्रिक दोष यांमुळें ठिकठिकाणीं राहून गेलेले ढोबळ मुद्रण-दोष सुधारून घेतांना मुद्रासुराच्या 'अवतारां'ना वाचकांनीं क्षमा करावी. }

# वाचकांची कोरी पानें

[गाजलेल्या टीकाकारांनाच नव्हे; तर प्रत्येक सामान्य वाचकालाहि...आपला निर्भिड बरावाईट अभिप्राय लेखकापर्यंत पोहोचविण्याचा हक्क-अधिकार असतो. तो बजावतां यावा या हेतूनेंच, हीं दोन कोरी पानें सोबत जोडून ठेवलीं आहेत. त्यांचा वाचकांनी जरूर उपयोग करावा.

जून १९४८ अखेरपर्यंत हा आपला हक्क बजावून हींच दोन पानें (वाटल्यास अधिक मजकुरासाठीं एखाद्या पानाची जोड देऊनहि) - व्यवस्थापक- 'पारिजात प्रकाशन' १४ बी, हरजीवनदास एस्टेट, व्हिन्सेन्ट रोड, दादर, मुंबई १४ या पत्यावर सुवाच्य लिहून पाठवावीत.

या मुदतींत येणाऱ्या अशा 'अनपेक्षित अनाहूत अभिप्रायां'च्या वाचक-टीकालेखकांच्या श्रमाचें अल्प-स्वल्प चीज व्हावें म्हणून, पहिल्या एकवीस अनुक्रमांना, कार्यालय एकूण तीस रुपयांची आपलीं पुष्पें आपल्या खर्चानें घरपोंच पाठविणार आहे.—व्यवस्थापक.]

'रक्त....नि....शाई'

'अनपेक्षित अनाहूत अभिप्रायार्थ'

—राखीव कोरें पान १—

‘ रक्त....नि....शाई ’
‘ अनपेक्षित अनाहूत अभिप्रायार्थ ’
—राखीव कोरें पान २—

( जरूर वाटल्यास आणखीहि पानें जोडावींत. )

# आकाश–वाणी !

‘आकाशवाणी’ !— खरं म्हणजे, मुळांत आवश्यकताहि नसतां, आधीं ‘चार शब्द’ लिहायला घ्यायचे नि (प्रथेनुसार ‘प्रिय रसिकांस’– कळवळ्यानें हांक मारून, आपलं ‘मनो-गत’, ‘हित-गुज’, ‘हृद्गत’ असं कांहीं तरी त्यांच्या कानांत सांगण्याऐवजीं) आपल्या त्या गद्य शब्दांना उलट आपणच ‘आकाशवाणी’ असं बेडरपणें संबोधावयाचं,..हा थोडा उद्धटपणाच म्हटला पाहिजे.

तथापि, हें प्रथमच सांगितलं पाहिजे, कीं, प्रस्तुत आकाश-वाणी एखाद्या स्वर्गांतल्या देवाची किंवा स्वर्ग-धरेच्या दरम्यान घोंटाळणाऱ्या देवदूताची नव्हेच नव्हे, पण (स्वतःला हडसून-खडसून ‘कवी’ म्हणणाऱ्या व म्हणवून घेणाऱ्या) एखाद्या अति-मानव असामान्य प्राण्याचीहि नव्हे. चालू शास्त्रीय युगांत, सामान्य माणसालाहि प्राप्त झालेल्या आकाशवाणीच्या नैसर्गिक हक्काचाच मी केवळ रास्त उपयोग करून घेत आहें.

पण अशी आकाश-वाणी करून, मला इथं माझ्या दिव्य-स्वर्गीय प्रतिभा-स्फूर्तींबद्दलहि कांहीं सांगावयाचं नाही; कारण उघडच आहे; तशी ती माझ्याकडे (विशिष्ट असामान्य मिश्रणा-

प्रमाणांत) सांपडेल, अशी माझी तरी कल्पना-अपेक्षा नाही. एवढं मात्र खरं, कीं, चार इतर भावशील, सुसंस्कृत, जिवंत,बुद्धिजीवी माणसांत...चांगलं जगण्यासाठीं जवढं चैतन्य असतं व असावं लागतं, तेवढं तें माझ्यांतहि खास आहे.

आणि छंद-पद-बद्ध भाषेंत आपलं मनोगत व्यक्त करण्याची थोडीफार हातोटी असणाऱ्या...(अर्थात् स्वताला कवी म्हणवून घेणाऱ्या अगर कोणी तसं म्हटल्यास त्याला आडकाठी न करणाऱ्या) –सामान्यांहून जरा निराळ्या मनोवृत्तीच्या– व्यक्तींतहि तें चैतन्य तेवढंच असतं; आपल्या आदर्श वाङ्मयीन अभिव्यक्तीसाठीं गद्याचा आश्रय घेणाऱ्या चांगल्या गद्यलेखकाहून जमीन-अस्माना-इतक्या अफाट अंतरावर तर तें चैतन्य खासच नसतं, असं मात्र माझं तरी अनुभवाचं नि प्रामाणिक मत आहे.

पण मग, या दृष्टीनेंच, कोणत्याहि कवीनें लिहिलेलं काव्य... हें देखील, कोणत्याहि सामान्य, सुसंस्कृत, जिवंत माणसाच्या आकलन–कक्षेंत आलंच पाहिजे !...केवळ हाताच्या पांच बोटांवर मोजतां येतील इतक्या निवडक साडेतीन शाहण्यांच्या 'चोखंदळ' रसिकतेवर नि त्यांच्या व्यक्तिगत लहरी निर्वाळ्यावर तें खासच अवलंबून ठेवण्याचं कारण नाहीं, असंहि मला वाटतं.



तेव्हां, प्रस्तुत चोंपड्याच्या वाचकांनी तरी अगदीं निश्चिंत असावं–"याद राखा !–मी कवी आहे;..माझी पातळी ती माझी पातळी !–माझं काव्य माझ्या उंच पातळीचं ! तें तुमच्यासाठीं तसूभरहि खालीं उतरणार नाहीं !!तें जर आस्वादायचं असेल तर तुम्हाला तितकं वर जाण्याइतकी बौद्धिक नि हार्दिक उचल आधीं असायला हवी;...ज्यांना ज्यांना माझं काव्य...त्याचा गूढ अर्थ...समजणार नाही,...ते उघडच खालच्या पातळीचे; त्यांना काव्य कशाशीं खातात तेंच कळत नाही!..ते पुरे अरसिक !–" –अशी एखादी धमकीहि इथं मला त्यांना द्यावयाची नाहीं.

बरं, माझ्यावतीनें, कोणा टीकाकारांच्या मेळाव्यानेंहि त्यांना ती द्यावी, अशीहि माझी इच्छा नाहीं. तशी ती कोणी देईल..अशी माझी अपेक्षाहि नाही. तथापि,चुकून कोणी तशी दिली तर त्यांशीं मी सहमतहि नाहीं. इतकंच नव्हे, तर दहा वर्षांपूर्वी, माझीं 'आजची गाणीं' वाचकांना सादर करतांना,मी जें लिहिलं होतं..त्यांतल्याच दोन ओळी आजहि पुन्हा इथं मला जोडाव्याशा वाटतात-"मी कवी न!-याही नच काव्याच्या खाणी!-आजच्या जगाचीं साधीं खडखड-गाणीं-!!"––

पण मग, या काव्याच्या खाणी नसल्या तरी त्यांत सामान्यांच्या हृद्भावनांचे प्रतिध्वनी तरी खास आहेत. तीं (एकदां तरी वाचून

बाजूला सारण्याच्या लायकीचीं ) कांहीं शब्दचित्रं आहेत. गद्यांतहि पद्याइतकंच काव्य सांपडतं; त्यादृष्टीनें, हें हवं तर काव्यमय गद्य म्हणावं. यांतील बारावं प्रकरण तर गद्यात्मकच आहे. पण त्या शेवटच्या पानांमध्येंहि थोडं-फार काव्य सांपडायला हरकत नाही. तेव्हां, एकूण हें निदान चांगलं वाङ्मय आहे आणि त्यांत ठिकठिकाणीं कमीजास्त जिवंतपणाहि आढळेल, असा निर्वाळा माझा मीच इथं देऊन टाकतों.

आणि या कांहीं कविता मी आज प्रसिद्ध करीत आहें, त्या केवळ या एकाच हेतूनें. अंतरंगांत मूळची कांही मौलिकता असलीच, तर ती पानाच्या अगर अक्षराच्या लहान आकारामुळें कमी होणार नाही, असा तर्कशुद्ध कयासहि मी बांधला आहे; नि त्याला धरूनच,(अभिनिवेश टाळण्यासाठीं म्हणा,.चालू महागाईंत माझी व पर्यायानें समाजाचीहि काटकसरीनें बचत करण्यासाठीं म्हणा,..) बारीक आकाराचा व 'पायका'चा मीं आश्रय घेतला आहे. (गाजा-वाजा झालेल्या एखाद्या टीकाकाराची दृष्टि, फक्त याच गौण बाबीकडे वळून,माझ्याशीं त्याचा कदाचित् मतभेद होईल कीं काय, न कळे !)

आपलं पद्यहि ('काव्य'?) आपल्या गद्याप्रमाणेंच पायक्यांत छापणाऱ्या न्याऱ्या 'कवी'नें...आणखीहि एका गोष्टीचा उलगडा केला पाहिजे. तो असा कीं, या काव्याच्या अंतरंगांत ठिकठिकाणीं



व्यक्त झालेले विचार, कल्पना, भावना इ. इ,..त्याच्यापूर्वीं होऊन गेलेल्या कवींच्या, ग्रंथकारांच्या, शास्त्रज्ञांच्या,..किंबहुना रस्त्यांतून चालणाऱ्या साऱ्या जिवंत सत्प्रवृत्त माणसांच्याहि मनांत येऊन गेलेल्या असतील!.त्यांतूनच तें सारं त्यानं उचललं असण्याचा दाट संभव असेल. कारण सर्व वाङ्मय,..मूलतः,जुनंच असतं!.. त्याला साऱ्याच जुन्या जगाचा आधार असतो.(तेव्हां, हें सांगायला आणखी कोणा टीकाकाराची मुळींच आवश्यकता नाहीं. तेवढ्यासाठीं,त्यानें पूर्वसूरींच्या नांवांची यादी करण्याची अगर सरस्वतीदेवी,सृष्टिसुंदरी वगैरेंची साक्ष बोलावण्याचीहि,..यातायात करण्याचं कारण उरत नाही.)

या आकाशवाणीच्या साह्यानें, हें सर्व मीच इथं स्पष्ट केल्यावर, मला वाटतं, महाराष्ट्रांतला आजचा एखादा टीकाकार माझ्या बाजूला वळण्याचा संभव नाहीं. (कारण, आज वाङ्मय भराभर निघत असलं, तरी टीकाकार हा प्राणी याच ठरावीक वर्तुळाबाहेर जाताना सहसा आढळत नाहीं. अर्थात् प्रत्येकाच्या तशा व्यक्तिगत कक्षा-मर्यादा या असायच्याच!...तो त्याचा दोष नसतो; त्या भाषेचं मात्र तें दुर्दैव असतं, एवढंच !-)

पण आपण बहुतेक साऱ्यांनीं अजून लोकांच्या डोळ्यांनी पहावयाचं सोडलेलं नाहीं. म्हणूनच तर टीकाकार या व्यक्तीचा मध्यें प्रश्न येतो. (आणि आपलं कर्तव्य जबाबदारीनें पाळणारे...

विचारी, रसिक, तज्ञ नि समतोल मनाचे प्रमाणिक टीकाकार प्रत्येक भाषेला लाभून, तिच्या वाङ्मयाची योग्य जोपासना व्हावी, हीहि प्रत्येक प्रामाणिक वाङ्मय-सेवक-वाचकाची इच्छा असते.) पण नाही तर,..बेजबाबदार टीकाकारांपेक्षां सामान्य जिवंत वाचकांनीच आपलं वाङ्मय एकदां तरी वाचावं..नि निःशब्दपणें त्याचा रसास्वाद घेऊन, जगाच्या अंतापर्यंत मग तें खुशाल बाजूला सारावं, हीच प्रामाणिक कलोपासकाची प्राथमिक इच्छा असते !- तशी ती माझीहि आहे.

त्याच साध्या अपेक्षेनें प्रस्तुत 'रक्त नि...शाई!' मी सामान्य वाचकांपुढें ठेवीत आहे. गेल्या धकाधकीच्या पांचसहा वर्षांत आपल्याहि मनांत असेच कांहींसे तरंग वेळोवेळीं उठून गेले, असा त्यांना अंधुक जरी भास झाला, .तरी माझं काम संपलं. त्यांना जें साठवून ठेवणं जमलं नसेल, तेंच मी इथं शब्दांत साठवलं आहे.

पण मग, फावल्या वेळांत (गद्यलेखनापेक्षां सुलभ वाटलं म्हणूनच) स्वतःच्या केवळ करमणुकीसाठीं, 'ट' ला 'ट'-'री' ला 'री' करून मी जें स्वतःशीं गुणगुणलों व आनंदलों,..त्यांतून,.. याहून अधिक मोठ्या दर्जाचं काव्य व्हावं अगर तें अधिक काळ टिकावं अगर त्याचा जादा गाजावाजा व्हावा, ही माझी कधी अपेक्षाच नव्हती व नाहीं.

कार्तिकी एकादशी
१८६९ }

विनम्र,
रघुवीर सामंत

[ (स्वदेशांत...नि जगाच्या पाठीवर चौफेर...)
सहेतुक सांडलेल्या मानवी रक्तास,...
रक्ताळ भूमीस,...नि अनंतांत विरून गेलेल्या
साऱ्या थोर त्यागी आत्म्यांस—

(सापेक्ष सुरक्षिततेंत जिवंत राहिलेल्या-)
एका निष्क्रीय हातांतून ओघानें सांडलेली
—ही रक्त-मय...हो, रक्ताळ शाई—

—सविनय सादर समर्पण-]

# रक्त...नि...शाई

रघुवीर सामंत

★

★

रघुवीर सामंत संपादित

★

अमर ज्योति

वाङ्मय

**आपल्या वाढत्या बाळांच्या हातीं द्या!**

नव्या पद्धतशीर पुस्तकांचे गट
छापून तयार होत आहेत.
लौकरच प्रकाशांत येतील.

★

१

# भाउ, तयार व्हा!

[ आजच्या विचारी नवजवानांचें– ' आगे कदम ' करताना–एकसाथ म्हणावयाचें स्वाभिमानी संघ-गीत– ]

## भाउ, तयार व्हा !

तयार व्हा!- तयार व्हा!-
...तयार व्हा, भाउ, तयार!!-

तुम्ही चावुं नका मनगटें, गड्यांनों!-
—स्वर्ग स्वतः फिरुनी जिंका!- ध्रु०

संस्कृती-नीतिचे जीर्ण घडे!-
आर्य-वंश!- वडिलांचे वाडे!!-
—नवयुगांत ते पडले उघडे!!-
तें जुनें गाडुं द्या स्मशान-भूमी!-
—नव-क्रांती-संगीत भरा!!- १

शृंगारें सजतें काय मढें?...
...पारतंत्र्य-पंकांतील किडे,...
कां होतिल हो वळवळुन बडे??-
नव पंख उभारा!- फिरा भरारा!!-
—करा, काय तें आतां करा!!- २



कडकडाट झाले घनघोर;...
...रक्ताचे खळखळले पूर;...
जगताचा पालटता नूर!
व्हा सज्ज!- उडी घ्या!... आहुति द्या, या!!-
—दिव्यें जिंका!- जगा जरा!!- ३

चिर गुलाम राखुन जगताला,
...जे मिरविति ध्येयांच्या माला,
...दाखवा तयांना शौर्याला!!-
नच तुकणारें शिर करांत घ्या!-
...घनघोर करा त्यांवर मारा!! ४

मनिं नग्न स्वार्थ खाई मांडे!...
—धर्मांची मांडुन थोतांडें,...
स्वसुखाच्या मार्गी कां धोंडें??-
नर-धर्म चालला रसातळा!-
...ही स्त्रैण यादवी नष्ट करा!! ५

दिव्य ध्येय !-तेजोमय गेह !-
...नर-वरांस मुळिं ना संमोह !-
...'मातींत मिळो मृण्मय देह !!-'
निज-रक्षेवर जग उजळति, त्यां-
नच अथांग-पार्थिवता-पाश !! ६

नर-तेज आजवर मातीस;...
...अणु-अणूंत भरला इतिहास !-
...भरविंते मायभू ते घांस !!
ज्या ध्यास मुक्तिचा,...वीर-भस्म तें—
फुलविल नव-चैतन्य-फुलां !! ७

निज-यज्ञें इतरेजन तरती;...
...स्वातंत्र्य-सुखाची मग भरती !-
—नव क्रांती ती, मिरविल धरती !!
व्हा अमर मृत्युनें !-जहर गिळुनि...
सुख-सुधा-वारसा द्या जगता !! ८



या प्रलया-अंतीं भूवरतीं,
जीं तेजो-बाळें अवतरतीं,...
तीं गातिल गत-रक्षा-कीर्ती !-
तें प्रलय-पोटिचें कोटि-भस्म मग...
...ज्योतिर्मय जग जगविल, जा ! ९

तयार व्हा !- तयार व्हा !-
तयार व्हा, भाऊ तयार !!-
तुम्हि चाटुं नका मनूगटें, गड्यांनों !—
—स्वर्ग स्वतां फिरुनी जिंका !

गांधी-जयंती १९४४

रघुवीर सामंतांचीं
आजची गाणीं
सांघिक गीतें
पृष्ठ १२४] [मूल्य रु. १.

# २

# 'जगेन! –' म्हणतो....

[परिस्थितीचा चरख तर अहोरात्र करकरतच असतो; जगतां जगतां मानवाचें चिपाडहि होतें. पण तरीहि प्रत्येक कर्तृत्वशील सत्प्रवृत्त ध्येयशील माणसाकडून पाझरणारा रस जगाला लाभतोच लाभतो.]

## ‘जगेन!’ म्हणतो –

हा चरख सारखा करकरतो !–
—जीवनांत रस परि पाझरतो !! ध्रु०

शिळी जरी तुज भाकर...भरडी,...
... लपेटशीं लक्तरें,...गोधडी,
... कुरकुरतें वाऱ्यांत झोंपडी;...
ध्येय-दीप जोंवर मिणमिणतो, ...
—जीवनांत रस बघ पाझरतो ! १

व्याकुळ कां चिर-काळ-मृगजळें ?
–फुलव जगीं, नव मळे आगळे !–
– सळसळ वर्षव स्व-रक्त सगळें ! —
नव पिकें अवनिवर नर भरतो,
— जीवनांत त्या रस पाझरतो !– २

गंध न ज्यांना,.. मोहक सुमनें,...
तव भंवतीं दिसतीं उद्यानें !–
–रानें तीं !–तूं त्यज धीरानें !!–
कर, ख-पुष्प खुडण्या, कर वर तो !–
—जीवनांत रस मग पाझरतो !– ३



क्षुद्र जगाला क्षुद्रच अभिमत !–
उद्धट जय-घोषांनीं मिरवत–
-लक्ष-यशांचे उभवति पर्वत !!–
लाभो न तुला लव भव-जय तो !–
—जीवनांत रस तव पाझरतो. ४

सर्वस्वाचीं करण्या दानें,...
धडक मारशिल जर धैर्यानें,—
विरेल भेसुर करकर-गाणें !–
तव आत्म-यज्ञ मग सुखकर तो !–
—जीवनांत रस तव पाझरतो !— ५

“क्षाळिन,...जाळिन,...जगींचीं पापें;...
...त्यांच्यासव वा जळेन तापें;...
–सुंदर होइन तेज-प्रतापें !...
मी नंदन-वन जगता करतों;...
...मम ज़ीवन-रस जगतीं भरतो.” ६

दौलत धर, तव माथ्यावरची;...
वारी... कंटक-वांटेवरची;...
—सोबत...मनच्या देवा-घरची;...
—रक्तांत न्हाउं दे तव पथ तो!...
— जीवनांत रस परि पाझरतो. -७-

चराचराची सृष्टी मृण्मय;
लय पावो ती!...तुजला कां भय?...
—ध्येय-मरण मरण्यांत खरा जय!!—
मातसि चिरंजिव जो करतो—
...जीवनांत त्याच्या रस भरतो!- -८-

किती तगमगशीं जीवा, वायां,...
-सार्थ कराया तव नरकाया,...
...हलाहला प्राशुन पचवाया?...
जगिं...'जगेन!' म्हणतो,...तो मरतो!!—
—जीवनांत रस परि पाझरतो!— -९-

हा चरख सारखा करकरतो...
— जीवनांत रस परि पाझरतो!- १०

[ २३ मे १९४३ ]



३

## प्रचंड आहुती ध्येयाची — प्राण!

१ भीती ही जेत्याची जीत!-
२ जीवा!- गा मुक्तीचें गान!-
३ सभोंतीं स्मशान-शांती—
४ मुक्तीचा प्रभाव
५ क्षणिक विश्रांत...
६ मुक्तीचा कोर...
७ ना वांकेल मान!—
८ मना ना पाश...
९ मेलेला दास!—
१० न्यारें आव्हान...
११ शौर्याच्या राक्षसी रीती —
१२ भरूं दे पुरा कटाह—
१३ मेलों ना दास-
१४ खेळलों डाव...
१५ सहानुभूतींत मानव मेले.
१६ मातीच्या पोटीं; ... हिऱ्याची खाण
१७ ध्येयाचे संवादी स्वर
१८ मातींचे मांगल्य-मोंती
१९ शोध अन्य दास्य-नरक!—

**स्थळ**—एका हिंदी तुरुंगांतील एक एकाकी काळोखी कोठडी.

**काळ**—'चले जाव' आंदोलनाचा प्रथम वर्ष-दिन व नंतरचे दोन महिने...

**भूमिका**—१९२० सालीं कॉलेजांतून बाहेर पडल्यापासून स्वातंत्र्य चळवळींत अव्याहत असलेला एक हिंदी सत्याग्रही वीर; त्याला यातना होत; पण तुरुंग हेंच त्याचें घर झालें होतें; 'लोकशाहीचें जागतिक महायुद्ध' चालू असतांच झालेल्या ९ ऑगस्ट १९४२ च्या सर्रास पकडापकडींत याचीहि पुन्हा 'विनानिर्णीत' उचलबांगडी होऊन तो राजकैदी झाला होता.

आंग्ल सत्ताधाऱ्यांच्या हृदयपालटाची नि लोकशाहीच्या निर्मलतेची, ...त्यानें सत्याग्रह्याला शोभेशा आशावंत शांत मनानें, वर्षभर, वाट पाहिली...आणि शेवटीं...

बंदिवासाचा वर्षदिन उगवतांच, केवळ स्वतःच्या प्रेरणेनें,...स्वतःच्या जबाबदारीवर,...(अन्यायाचा प्रकट प्रतिकार म्हणून) आमरण अन्न-त्यागास त्यानें सुरवात केली—



पासष्ट दिवस त्याचा अस्थिपंजर देह मृत्यूशीं झगडत राहिला. तो झुंजत झुंजत क्षीण होत होता;...शेवटीं, मरण त्याच्या देहा-द्वाराशीं उभें राहिलें...पण तो डगमगला नाहीं.

एक दोनदां जबरीप्रयत्न झाले; पण अन्न-ग्रहणाला त्यानें कसून विरोध केला. शेवटीं, परिस्थितीनें आपला वांट्याला आलेल्या त्या तुरुंगातल्या कोठडींत,...आपल्या रकट्यावर पडल्या पडल्याच,... आपला अंत व्हावा, या त्याच्या आग्रही इच्छेनुसार तो आज तेथें तसा निश्चल पडला होता—

त्या अंतिम ग्लानींतच त्याचा जीव आकांत करून... खडबडून जागा होतो. त्याच्या श्वासांत,...त्याच्या हालचालींत, त्याच्या ओढलेल्या निस्तेज डोळ्यांत स्वाभिमान...विचार,... भावना...तरंगू लागतात—

त्याच्या तोंडून मंद मंद शब्द येतात—

## भीती ....ही जेत्याची जीत!

रावाला करीतो रंक, ...
दास्याचा कृष्ण कलंक!
मारीती मानव-वंश ...
सत्तांध सर्पांचे दंश!
मृत्यूच्या भीतीनें लीन, ...
निःशस्त्र, अपंग, दीन!
सत्तेच्या रक्ताळ रंगें,...
जगांत रंगलीं जंगें!
भीती ही जेत्याची जीत;...
सत्तेचे पाशवी हात!!
काळाची काळी छाया ती!–
नराला अखंड भीती!! –
योजीती दिन नी राती,...
जिवंत मृत्यूच्या रीती!

२० - ८ - ४३



## जीवा! - गा मुक्तीचें गान –

राहीलों बंदी सदाचा;
वेडा मी... फंदी मुक्तीचा!
केला मी सर्वस्व–त्याग;
मांडीला देहाचा याग;
सारे जे दास्य–तुरुंग,...
लाविले त्यांना सुरुंग!
अंगांत आतां ना त्राण !...
...डोळ्यांत ठाकले प्राण!
माझा हा जीव – पतंग ...
मुक्तीच्या ज्योतीनें गुंग!
आणि,..हा देह–तुरुंग?
...लाविला त्याला सुरुंग!
देहा! दे...मुक्तीला दान!
जीवा! गा...मुक्तीचें गान!

२० - ८ - ४३

## सभोंतीं स्मशान-शांती.

["प्रचंड आहुती ध्येयाची.... प्राण!...
आला रे आला हा मुक्तीचा क्षण!"]

दिन नि राती ... या येती नि जाती;
स्मशान-शांती! ही स्मशान-शांती!!
उभ्या या सभोंतीं पाषाण-भिंती;
अंधार सदाचा माझ्या सांगाती.
कोळ्यांच्या जाळ्यांत, ... सांदी-फटींत, ...
बद्ध-कीटकांचें भेसूर गीत;
अंतर रडतें आंतल्या आंत!...
..लागली जीवांच्या गळ्याला तांत!!
मनांत माजें हें रण:
डोक्याची झाली ऐरण;
हृदय-स्पंदन क्षीण;
...फेडीन परी मी रीण!!
आटूं दे रक्ताचा कण नि कण!
आला रे माझा हा जाण्याचा क्षण!!

१४-८-४३



## मुक्तीचा प्रभाव

["प्रचंड आहुती ध्येयाची — प्राण!
आला रे माझा हा मृत्यूचा क्षण!"]

माझा जड देह मृत्यूच्या दारीं;
संपेल आतां या जन्माची वारी!
देहा चीणतील कारेचे चीरे;
मुक्तींत विरेल. आयुष्य खिरें!
प्रेमानें धावे हा स्पर्शांचा वारा;
आनंदे लोटती नयनीं धारा!
तमाशीं झुंजून फीरे माघारा;
मुक्त, स्वैर, जगीं धावे भरारा;...
(रावा वा रंकाच्या दारा,
— भेद ना प्रासाद-कारा;-
प्रभाव मुक्तीचा सारा!
दास्याचा त्याला ना वारा!)
होईन वाऱ्याच्या पोटीं विलीन!
आला रे माझा तो मुक्तीचा क्षण!!

१५-८-४३

## क्षणिक विश्रांत —

[" प्रचंड आहुती ध्येयाची,... प्राण!
आला रे आला हा जाण्याचा क्षण! "]

कुडीला कोंडे ही अंधार - कोठी;
—गराद्या!.. (लोहाच्या पाशाच्या गांठी!)
जिवंत चालली माझी ही ताटी;
चैतन्याला आली आतां ओहोटी!
ऐहिकाची आस परि ओढे पाठीं!
तळमळे जीव जीवनासाठीं!
जीव घाली देहा आर्त हांकाटी;
नाना भाव मनीं करती दाटी!

मुक्तीचा माझा आकांत,..
तोडल्या बेड्या विक्रांत;
आली ही देहाची भिंत;..
क्षणिक झालों विश्रांत!

फोडून तनूचा तट जाईन!
— आला रे आला हा मुक्तीचा क्षण!

१६-८-४३



## मुक्तीची कोर!

[" प्रचंड आहुती ध्येयाची ... प्राण!
— आला रे माझा तो मुक्तीचा क्षण!! "]

करीती कल्लोळ सुप्त भावना;
जड-सुख-आशा साऱ्या जीवांना;
प्रवाह—पतित भुलती भाना;
मातीच्या मोहानें धरती मौना.
नभीं ऊंच परी मुक्तीची कोर;
मनाला आणते भरती थोर
आणि ... त्या ध्येयाचा जीवाला घोर;
तनूला नावरे मनाचा जोर!

(नयनीं अश्रूंच्या धारा;
देहाला दास्याचा चारा!
माय-भू दैन्य-पसारा,..
जिथें ना मुक्तीला थारा!)

दैन्याचें, ... दास्याचें फोडीन ठाण!
—आला रे माझा तो मुक्तीचा क्षण!!

१६-८-४३

## ना वांकेल मान!

["प्रचंड आहुती ध्येयाची – प्राण!
– आला रे माझा तो मुक्तीचा क्षण!"]

कशाला केला हा देहाचा होम!!
कोण ना करील? ... ज्याला तो जोम!!
कोणाला लाभे या जगीं आराम?
कोण ना सोडी हें सुखानें धाम!!
(पोटींच्या आकांक्षा मरती ओठीं;
मिळते सत्याच्या हांकेला कोठी;
जन्माच्या हक्काला ठेंचते लाठी;
रौरव-दास्याची मगर-मिठी !!)

काजळी पापाच्या तख्तीं,...
राक्षसी साम्राज्य-शक्ती !-
सीमापार येथें मुक्ती;
प्रेमाची चालेना युक्ती !

ना वांके ! ना वांकेल, माझी ही मान !..
आला रे माझा तो मुक्तीचा क्षण !..

१७-८-४३



## मना ना पाश!

["प्रचंड आहुती ध्येयाची,.. प्राण!
–आणीन माझा मी मुक्तीचा क्षण!"]

स्वार्थांध पशूंचा मानवी नाच!
– शस्त्राचा, शास्त्राचा, सत्तेचा जाच!
एकाच्या सुखाला कोटींचा वेंच!
पोटाच्या खांचेचा भीषण पेंच!
तनूला लादले लोह-लगाम,
स्वातंत्र्य-सौख्याचे कराया होम!
आशेनें तो आणी आंत गुलाम,
चाराया तुरुंगीं भयाण तम!!

कशा हो ही वेडी आस?
तनूला घालून फांस,..
मना ना पडेल पाश!
...ध्येयाचा ना होई नाश!!

देहहि ज्या वाटे तुरुंग दीन,
त्याला हा आला रे मुक्तीचा क्षण!

१७-८-४३

## मेलेला दास!

[ "प्रचंड आहुती ध्येयाची – प्राण!
आला रे आला रे...मुक्तीचा क्षण!"]

वांकली जननी शृंखला - भारें;
मनानें मेलेले बांधव सारे.
शस्त्रानें रावांच्या रक्ताचे झरे;
पाशवी जगांत न्याय ना उरे.
स्वार्थानें मिटतीं प्रेमाचीं दारें;
तुरुंग,...गुलाम देशाचीं घरें !!
संस्कृती-रक्षक दांभिक सारे!
कवाडें फोडण्या धावलों धीरें !!

(पापी! जो घाली शृंखला,
लांछन होतो भूतला!
परी जो नमून खलां,
...दास्यांत बुडून मेला?...)

मेलेला दास?... तो पापाचा खाण
-आला हा माझ्या रे मुक्तीचा क्षण !!

१५-८-४३



## न्यारें आव्हान–

[" प्रचंड आहुती ध्येयाची प्राण!
आला रे आला रे मुक्तीचा क्षण!"]

पोलादी पंजांची पडेल गती;
...सत्तेचे चरख भेसूर गाती!
जेत्यांचीं जीतांशीं पाशवी नातीं,...-
मानवीं मनें तीं पिंजून जातीं!
साम्याचा, प्रेमाचा, सन्मार्ग नुरे;...
मायभू अफाट तुरुंग उरे!
जाणीव जीवाच्या जिव्हारीं भरे -
'साम्राज्य- किंकर जिवंत मरे!'

मारून मुक्तीची आस,...
केलेत निःशस्त्र दास!...
नको ते मेलेले घांस!
मारीन माझ्या देहास!

पाशवी सत्ते!...हें न्यारें आव्हान–
-'आणीन माझा मी मुक्तीचा क्षण!'

१८-८-४३

# शौर्याच्या राक्षसी रीती!

[" प्रचंड आहुती ध्येयाची... प्राण!
-आला रे माझा हा मुक्तीचा क्षण !!"]

समाज, संस्कृती, भाषा, नि आशा-
थोर तो सोपान चढे आकाशा;
झाली लुली परी प्रेमाची भाषा;...
घोर स्वार्थें ईर्षा पेटते नाशा:
लक्षकोडी गेले मानवी काय!
शस्त्रास्त्रें झुंजती ध्येयाचा न्याय!!
शस्त्रास्त्रसाधनें,...राक्षसी धन!
जाळी मुक्ती- धन,...मानवी मन!

[युद्धाचे पोवाडे होती;
शस्त्रानें ध्येयाची मिती;
-आप्तांची अन्यांची माती;
-शौर्याच्या राक्षसी रीती!]

ध्येयाला, अर्पीन माझे रक्त-कण!
-आला रे आला हा मुक्तीचा क्षण!

१६-८-४३



# भरूं दे पुरा कहाट!

[" प्रचंड आहुती ध्येयाची प्राण!
-आला हा आला रे मुक्तीचा क्षण!"]

मुक्तीच्या मार्गें मी धरून धीर,
जोमानें झुंजलों,... पोलादी-वीर;
आशेनें धावलों कांटेरी माळ;
आयु?.. छे:, चेतल्या चितेचे जाळ!!
त्यागीलें तारुण्य, कांता, नि बाळ;
स्वताच्या हातें हा घातला घोळ!
अंतीं, हा देहाचा अस्थी-पंजर!
आतां कां जीवा, हा लागावा घोर?

(जातांना सोडून गेह-
कशाला वेडा संमोह?
भरूं दे पुरा कहाट!
होउं दे निश्चल देह!!)

प्रचंड आहुती ध्येयाची... प्राण!
- आला रे आला हा जाण्याचा क्षण!!

१६-८-४३

## मेलों ना दास!

["प्रचंड आहुती ध्येयाची... प्राण!..
आला हा आला हा मुक्तीचा क्षण!!"]

घेतले घोंट, ... नि अन्नाचे घांस,
देहा पोसवी जें रक्त नि मांस,
हवेचे श्वास, नि जिवाचे ध्यास,
– साऱ्यांनीं मनाला दिला विश्वास!

वाटलें ... "निश्चीत तोडीन पाश!
वारस मुक्तीचा प्यारा स्वदेश!"
आणि, या देहीं त्या मुक्तीचा वास!
मेलों मी - तरी मी मेलों ना दास!

ना झालों हत, स्थितीनें,..
झुंजलों नि-र्बंध मनें!
सरावें घाण्याचें गाणें–
म्हणून वेंचलें जिणें!!

मुक्तीच्या मंदीरीं पोचले प्राण!
देहाची माती;..नि मुक्तीचा क्षण!!

१५-८-४३



## खेळलों डाव!

["प्रचंड आहुती ध्येयाची प्राण!
– आला रे आला हा मुक्तीचा क्षण!!"]

मातींत माती! नि नुरेल नांव!...
कोणा ना भासेल माझा अभाव.
अगाध मानवतेचा अर्णव;
त्यांत बिंदूमात्र माझे बांधव!
त्यांतला एक मी दुबळा जीव!
जाईना;...राहीना! कशाला कींव??
परी ना विरेल ध्येय राजीव!
मेलेले करील पुन्हां सजीव!!

खेळलों माझा मी डाव;..
घेतला मातीचा ठाव!!
प्रखर आंतला भाव;..
प्रकट केला स्वभाव!!
चौफेर जातील ध्येयाचे कण!...
–आला रे आला हा मुक्तीचा क्षण!!

१५-८-४३

## सहानुभूतींत मानव मेले!

["प्रचंड आहुती ध्येयाची ...प्राण!
आला रे आला हा मुक्तीचा क्षण!!,,]

(जरेनें पिकून,... झिजून मेले;..
तरीहि स्वकीय नयन ओले!..
रोगांच्या खायींचे खादाड घाले;...
त्यांच्याशींही झुंज आतांची चाले!
मार्गांतून कोणा मृत्यूनें नेलें;...
बांधव धांवून सभोंतीं आले!)
मानव सहानुभूतींत मेले!...
विश्व चाले, डुले...अश्रूंच्या जलें!!..

तेहां, हें आव्हान काला-
"प्यार जें माझ्या जीवाला,
आदरें पूजण्या त्याला,
देतों ही देहाची माला!!"

त्यागा ना सहानुभूतीची वाण!
आला रे आला हा जाण्याचा क्षण!!

१५-८-४३



## मातीच्या पोटीं,..हिऱ्याची खाण!

["प्रचंड आहुती ध्येयाची...प्राण!
आला रे आला हा मुक्तीचा क्षण!"]

समाज-स्वातंत्र्य-आकांक्षा ज्यांची,..
प्राणाहुती त्यांच्या मना ना जाची.
मुक्तीचा पाईक एकाकी मरे;...
-कोटी जीवीं त्याचें दिव्यत्व भरें!
दिव्य ध्येय जगीं जगावें थोर;..
जाणून, खोललें मृत्यूचें द्वार!
मातीच्या पोटीं... ही हिऱ्याची खाण!
...काळाशीं झुंजू दे सत्याचें वाण!!

आदी-अंतातीत तत्व-
"आधीं दे सर्वस्व,.. स्वत्व!
ध्येय-मृत्यू हें दिव्यत्व!!
दुजें ना जगीं देवत्व!"

पटे ही मनाला देवाची खूण!
चला रे आला हा मोक्षाचा क्षण!!

१८-८-४३.

## ध्येयाचे संवादी स्वर !

[" प्रचंड आहुती ध्येयाची प्राण !
आला रे आला हा मुक्तीचा क्षण !]
नां मना बाधली दास्याची व्याधी ;
केला ना पापाशीं स्नेह मी कधीं !
हृदयीं फुलला तेजाळ बाग;..
आतां अंत श्वास सुखानें माग !
केव्हां तरी कोणा बंधूचें ऊर...
छेडेल ध्येयाचे संवादी सूर !
सत्ताधारी क्रूर,... परी ते नर !
त्यांच्याही नयनीं अश्रूंचे नीर !
प्रभावी, दिव्य, अजस्त्र,..
गाजेल सोज्वल शस्त्र !
अजिंक्य, थोर प्रेमास्त्र,
चिरंतन त्याग-शस्त्र !
त्या भावी युगीं, हें अमूर्त मन
मुक्त त्या सोन्याच्या मातीचे कण !!

१८-८-४३



## मातीचे मांगल्य मोती !

[" प्रचंड आहुती ध्येयाची प्राण !
आला रे माझा तो मुक्तीचा क्षण !!"]
देहाच्या राखेची कशाला खंत ?..
– ध्येय-निनादाच्या हांका अनंत !
मंत्र तो ... अनंत चक्रें भेदेल;..
... स्थळ - काळ - युगें - सीमा लंघेल !!
विश्वाला देईन दिव्य मी माती !
— होतील कणांचे मांगल्य – मोती !!
माझ्या या रक्ताचा बिंदू नि बिंदू ...
... निर्मील तेजाचे अफाट सिंधू !!
मूठभर माझी माती–
अखंड तेवेल ज्योती !
नरा अंतीं दिव्य स्फूर्ती;..
ध्येयाची गाईल कीर्ती !
त्याग, नि यातना,...ध्येयाचें दान !
आला रे माझा तो मुक्तीचा क्षण !

१८-८-४३

## शोध अन्य दास्य—नरक घोर—

पुरे! जीवा पुरे!! थांबला श्वास!!...
आली काळ—निद्रा साऱ्या गात्रांस!

शद्ब ही संपले! वाऱ्याचे स्वार!
बोलक्या मनाचा आतां आधार!

जीयोगें रोंवला तूं मुक्ति-रोप...
घेई त्या तनूचा मोदें निरोप!

वाढेल विस्तार! फुलेल छाया!!
मानवी मातीला मुक्तीची माया!!

सोड या देहाचा अंतीम श्वास;
...आणि घेर घाल साऱ्या विश्वास!

भेद अंतराळें!... मुक्त...चौफेर!
शोध अन्य दास्य—नरक घोर!!
...त्यागानें दिव्यत्व मुक्ती—तेजाला!!
अंतीं घे दास्यींच नर—देहाला!

फिरूनी प्रचंड आहुती...प्राण!
देशील...घेशील...मुक्तीचा क्षण!!

आला रे आला हा मुक्तीचा क्षण!
...येईल फिरून मुक्तीचा क्षण!!

२०—८—४३



४

## सात सागरापल्याड व्हा—

[ पारतंत्र्याची घृणा, स्वत्वाची जाणीव, सत्याचा आग्रह, स्वतःच्या व जगाच्या निरामय सुख—शांतीची तीव्र आकांक्षा, मानवी प्रेम—बंधुभाव इत्यादि ओजस्वी ध्येयांनी प्रेरित अशा १९४२ सालांतल्या महात्माजींच्या '**करूं वा मरूं**' या निर्धाराच्या प्रचंड 'चले जाव!' चळवळीचें सांघिक पुकार—गीत ]

१-सात सागरापल्याड व्हा
२-पाप क्षालना पळा ...
३-ठाकलों खडे अतां—
४-राष्ट्र राष्ट्र जागृत...
५-लोकशाहि हिंदवी—
६-लोकशाहि गाडती!
७-येशु आज भारतीं!...
८-रक्त देउं आमुचें!
९.-जिंकुं शांतता आम्ही!
१०-सौख्य-शांति भूवरी...

## सात सागरापल्याड व्हा!

लोकशाहि – वीर हो, उगवला मनू नवा!
करूं.. न वा मरूं अम्ही; ... या क्षणींच दूर व्हा!!

माजुं देत यादवी; ... ती आम्हांस चालते;
...सात सागरापल्याड व्हा इथून चालते!!

'चोर मातले जगीं!'— कां उगा पुकारतां?
अजुन देत ढेकरा,.. धरा समग्र व्यापतां.

तुम्हां हव्या कशा शिव्या,.. नि दर्पयुक्त वल्गना?
जाणतों अम्ही तुम्हां;.. करा न आत्मवंचना.

[आव आणतां जणूं ... साव सत्वशीलसे;
...घाव घातलेत, राव!.. सूज्ञ एकदां फसे!]

कां बकासुरापरी अजुनि वृत्ती हावरी?
...कृष्ण-सर्प-साधुता कुणा कधीं न सांवरी!

शीघ्र येथूनी पळा; ... स्वगृहास वांचवा!
–दास ना कुणीं जगीं;...उगवला मनू नवा!

९-८-४२



## पाप–क्षालना पळा!

क्षीर पाजलें तरी दंशला अम्हां उरीं;
दिली तुम्हांस ओसरी,..पसरलां घरावरी!

झुंजवून कोंबड्या, ...हासलांत खदखदां;
...धूर्त जंबुकापरी पेरल्यांत आपदा!

उभविल्यांत आमुच्यांत दूहिच्या गिरी–दऱ्या;
...तापल्या तव्यावरी भाजल्यात भाकऱ्या!

टाकल्या शितांवरी नग्न नाचलीं भुतें;
...शोधलींत आमुचीं सदा नवीं व्रणें–क्षतें!!

["चोर कालचे, तरी कृष्ण-कर्म ना पचें;
...तागडींत टाकलेंत ...राष्ट्र-तेज आमुचें!]

कनक नेउनी घरीं, ठेवलींत खापरी!
(गाडिलीं मढीं तरी पाप बोलकें परी.)

पाप-कर्दमीं किती हात माखले पहा!
...पाप-क्षालना पळा!.. प्राप्त काल हा महा!

९-८-४२

## ठाकलों खडे अतां–

माय-भूमि आमुची तुम्हांमुळेंच यमपुरी ;
कृपा करा ;... फिरा घरीं !... झोंप आमुची पुरी !

जाहलों तुम्हांमुळेंच आज स्वत्व-पारखे ;
मित्र ना तुम्हीं ;...अम्हां चोर सर्व सारखे !

अन्य शत्रु ना दिसे ; तुम्हिच शत्रु एकटे !
..करुनि बाहुलीं अम्हां लावलींत तर्कटें !!

क्षुद्र स्वार्थ फुंकले ;... जाळ कितिक उभवले ;..
...उभे सुभे नवे नवे ;.. देशद्रोहीं माजले !

[अंजनें नवीं-जुनीं घातलींत लोचनां ;..
ठाकलों खडे अतां, स्वयेंच दास्य-मोचनां. ]

' लोकशाहि राखतों !'...कां फुका फुशारकी ?
..ग्रासलींत पर घरें, पुरीं करून पोरकीं !

आस हीन नागडी ;.. प्रिय मनांत तागडी !
..लोकशाहि बेगडी ... फिरवणार पागडी !!

१०-८-४२



## राष्ट्र राष्ट्र जागृत !

आत्म-तेज सांगतें– 'व्हा खडे !.. नि जा पुढें !'
–भीक कासया अम्हां ?... अम्हि अतां न बापुडे !

बंध ना अम्हां अतां ; असुं सजीव वा मृत !
उगवला मनू नवा ;... राष्ट्र–राष्ट्र जागृत !

मित्र ना कुणी, अम्हीं दास्य–मोचनीं खडे ;
अहिंदि सर्व सारखे;.. त्यांस चारतों खडे !

सज्ज जे मरावया,.. त्यांस मार्ग सांपडे !
दास्य–मुक्त व्हावयास आज शिंपडूं सडे.

[करूं न वा मरूं अम्ही ;-उगवला मनू नवा !
सिद्ध आत्म–रक्षणा !... इथुन आज दूर व्हा ! ]

आग ना अम्हां नवी ; राख आमुच्या मनीं.
...सतत पेटते चिता पारतंत्र्य-जीवनीं !

आग लागली जगा ! – लागु देत बापडी
सृष्टि-पाप क्षाळणार,.. लक्ष-मोल ही घडी !!

२१-९-४२

## लोकशाहि हिंदवी —

बंदुका उभारवा ;.. संगिनी ह्रदीं धरा ;
आग पाखडा वरून ; ...वा धरातळीं पुरा!
छळुनि निर्बला सती, ... बाल-रक्त सांडवा ;
लोकशाहि-शूर हो!... शौर्य हेंच गाजवा !!
जन-मनास ठोकरा ;.... पदतलीं पडो चुरा.
बाहुली जमा करा ;.. नि लोकशाहि उद्धरा!
ज्ञान दीप मालवा नि घोर वीष कालवा!
दंडुक्यासवें खुशाल राज्य-यंत्र हालवा!
[स्वार्थ-लालसा मनी तोंड वाजवा सदा ;
शस्त्रहीन, सत्वशील;.. त्यास दाखवा मदा!]
ढोल वाजवा खुशाल लोकशाहिचा नभीं ;
लोकशाहि हिंदवी आज उजळतां उभी!!

आत्म-तेज आमुचें अस्त्र आज भारता!
शस्त्र मारण्या उरीं कां उगा उभारतां!!

२१-९-४२



## लोकशाहि गाडती

दंमनायकी बळी, ... भावहीन या जगीं;
दास मानवा करीत पाश पाशवी जगीं.
दंड थोपटून झोंड चंड कुंड मांडती ;
निर्दळून निर्बलां परस्परांस निंदिती.
पुंड-झोंड भांडती ; समर घोर मांडती ;
आस आत्म-श्रेष्ठता ; ... दीन-रक्त सांडती !
झुंजवून पाशवी नवनवीन आयुधें ...
...पाखडून राख .. राख ... रक्त सांडती मुदें !
[नग्न-स्वार्थ साधण्या राष्ट्र-द्रोही जोडती ;
लोकशाहि-वीर हे ..लोकशाहि गाडती !!]
सत्य सर्व टाळती ; जीभ का विटाळती ?
... पापपंकिं लोळती; ..कां जगास जाळती ??
प्रेम दावती कशा नाटकी नि कोरडें ?
-विजय-दुंदुभी-सवें पुन्हां झुकेच पारडें !!

२१-९-४२

## येशु आज भारतीं!

सत्य, त्याग, बंधु-भाव, ... हेंच येशुचें बळ!
येशु-धर्म-निष्ठ! - आज दावितां पशू-बळ!

ध्येय ना तुम्हा हृदीं; - नीच स्वार्थ पाझरे!
.. पीडितां पशू-बलें;... ख्रिस्त शोभतां खरे!!

तुडविलींत पद-तलीं येशु-वाणि उज्वला;
.. येशुभक्त बेगडी तुम्हि महींत मातलां!!

येशु लाजला तुम्हां;...आज येत भारता!
श्याम-वर्ण-येशुला येशु-भक्त मारतां!!

[आत्मप्रौढि गाजवा!.. दंड-शाहि माजवा!
सूर्यतेज येशुचें! - करिल काय काजवा?]

युद्ध खेळलों पुरा,... जीवनीं पदापदां;
आज अपदा उभ्या! - नि भावि वेळ तापदा!

युद्ध-भीति ना आम्हां;.. युद्ध-मालिका आतां!!
...सत्व-शील राखिती मान उंच उन्नता!!

२६-१-४३



## रक्त देउं आमुचें--

"राव आमुचें अम्ही भोगणार स्वगृहा!
जन्म-सिद्ध हक्क हा!...हीच आमुची स्पृहा!!

राष्ट्र एक आमुचें;... हो अहिंदु हिंदु वा!
- करुं न वा मरूं अम्ही! उगवला मनू नवा.

करुं घरांत यादवी,..निर्मुं दिव्य स्वर्ग वा;
सिद्ध आत्म-रक्षणा!... तुम्हि इथून दूर व्हा!

आग लागुं दे घरा,... ना मनांत दीनता;
लाजवूं पशू-बला, ..नि मत्त ध्येय-हीनता!

[रक्त देऊं आमुचें; तख्त फोडुं पाशवी!
वितरुं शांतता जगीं; आणुं टवटवी नवी!]

शस्त्र कासया अम्हां?.. निश्चयी अशांतता!
..आत्म-यज्ञ आमुचा...करिल मुक्त भारता!!

ध्येय एक आमुचें – "अम्हि करूं न वा मरूं!..
सत्य, त्याग, प्रेम–राज्य अम्हि महीतळीं भरूं!!"

२६-१-४३

## जिंकु शांतता अम्ही !

लूटमार मारतां लोकशाहिच्या मिषें;...
...कल्प-वृक्ष जाळतीं वर्ण-शाहिचीं विषें !

मानवी जगीं अजून श्याम-वर्णता नडे;
...चोर झुंजतां !...परी गौर एक कातडें !!

गौर-काय मांडतां कृष्ण-कर्म खाटकी ;..
कृष्ण-वर्ण सिद्ध आज गाडण्या भुताटकी !

कृष्ण-वर्ण आमुचा;..कृष्ण..सारथी-सागा !
धवल कीर्ति आमुची;.. उद्धरील ध्वज जगा.

[ शाम-गौर जोंवरी सारखे न महितलीं , ..
झुंज ना सरे अतां !..मोक्ष-वेळ पातली !! ]

बंधं ना आम्हां अतां;..नभ अनंत व्यापणें !
आत्म-शक्तिच्या बळें तम समूळ जाळणें !!

युद्ध जिंकणें तुम्ही पापमय पशू-बळें;
...जिंकु शांतता अम्ही ! आत्म-तेज आगळें !!

२६-१-४३



## सौख्य-शांति भूवरी !

शुद्धि-तेज आणण्या आत्म-यज्ञ चालवूं ;
...यादवी न भारतीं; पक्षभेद मालवूं !..

शांतता-पथा धरूं;...सत्य तेंच आचरूं ;..
..आत्म-आहुती-बळें दास्य-आपदा तरूं !

जिंकुं आसुरी जगा; तनु-बलास ना डरूं ;
दिव्य आत्म-शक्ति-मंत्र आम्हि महीतलीं भरूं !!

सौख्यदायि बंधनें;.. ना मनास जांचणी ;..
...जन्म ना सरे इथें मानहीन याचनीं !

[ सुख समस्त मानवां,.. ना जगांत आपदा ;..
मुक्त सर्व ज्या-स्थलीं, तेथ शांति-संपदा !! ]

भावशील जीवनें.. रौप्यरश्मि तोडणें !..
नर नुरेल आसुरी;.. अंधता न ये धनें !!

कोण ना मरे भुका !... वर्ग-युद्धही नुरे !
मायदेश-वैभवें सौख्य-शांति भू वरे !!

२६-१-४३

रघुवीर सामंतकृत

* स्निग्ध–निबंध– ‘पणत्या’

* जिवंत स्वभाव-चित्रें ‘मासलेवाईक प्राणी’

*सोज्वल कथा– ‘वाळूंतील पावलें’

गटाच्या ग्राहकास सवलत

५

## – सत्ताधीश –

[जगाच्या पाठीवर कोठेंहि...नोकरशाही म्हटली कीं तिचें जीवन–तत्वज्ञान एकच! परतंत्र देशांत तें अधिक भडक-भयंकर असतें, एवढेंच. सत्ताधी-शांचें मनोगत असेंच असेल, नाही?— ]

*

*

"रक्त-राखेचीं जरी हीं आज अभ्रें दाटलीं,...
अन् अंबरें कोंदाटलीं,...

शांति–सौख्यें वांटण्याची ... भोवतीं ... या भूतलीं...
ही आण आम्ही घेतली!...

अब्धिचे अब्धी असू द्या!... घोर वा रानें-वनें,..
...तीं जोंवरी देतीं धनें -

धांवतों वाऱ्यावरी,.. वाऱ्यापरी;... कां मोजणें..
हीं योजनेंच्या योजनें??...

नोकरी हा दुर्ग लाभे!... स्वर्ग आम्हां अन्य ना!...
-ही...हीच कांक्षा,.. भावना!

गोत ना ठावें कुणाचें,... धर्म ना,... त्यां राष्ट्र ना–
जे सज्ज विश्वा वेष्टण्या!

घोर अंधारीं,... जिथें ना शिस्त..ना शास्ता कुणी,...
अन् अज्ञ..राष्ट्राचे धनी,

तेथ जातों, हालवितों...राज्य-यंत्रें जोडुनी,...
तें 'बंड' त्यांचें फोडुनी!

*



दावितों औदार्य सारें शब्द-शौर्यानें भल्या;
..या लेखण्याही लाभल्या!

धूर्तता, बुद्धी, चिकाटी,..देणग्या ज्या गावल्या,...
त्या चक्रवाढी लावल्या!...

भंगलीं वा गंजललीं राज्य-यंत्रें चालतीं,
...त्यां जोंवरी आहे गती,..

मानवी संहार होवो;..आग सांडो पेटती!..
–कां हो उद्यांची जागृती?

जोंवरी शाबूत आम्ही,... भैरवांना नाचुं द्या!..
अन् घोर वाहूं द्या नद्या!..

भूतलीं राहूं पुढारी एकटे आम्ही उद्यां!..
..हीं आज 'बंडें' माजुं द्या!

राजनीतीचे मुरब्बी,.. राज्य-सूत्रें हालवूं..
अन् वीष दुग्धीं कालवूं!.

तूप-पोळी राखुनी खाण्या,.. दुज्यांना राबवूं!..
...त्या बाहुल्यांना नाचवूं!!

*

न्यायबुद्धी-लोकशाही-नाटकें दावूं जगा,
हा राजनीती-तोडगा !..
फोडुनी झोडूं दुज्यांना !.. ना दया दावूं उगा !..
ते शत्रु.. जे देती दगा ! ..
दोष माथीं मारतों, ज्यां पाडतों आम्ही बळी,
या काढुनी खोल्या कळी !..
चाखण्या पाणी सुखानें, राखतों आम्ही तळीं !..
ही रीत मोठी सोंवळी !!

बोलती...'सामर्थ गेलें नोकरांचें भूतलीं !..'
..तीं अर्ध-सत्यें मातलीं !
वल्गना नाना करूं !.. अन् मूढ ठेवूं झांकली !..
त्यां दाखवूं आम्ही बली !!.
झिंगलों सत्तामदाची घेउनीया वारुणी, ...
त्या दुर्बलां संहारुनीं !..
पूर्व-स्वप्नें भंगलीं तीं, पाठ देणें ये रणीं, ..
..हें आज त्यांच्या तारणीं !..

*



सूड घेती या क्षणीं,.. जे निर्दलोनी वाढलों,..
..ज्यांच्या घरीं जोरावलों !
चौकडे वेढा पडे; .. कोंडींत आम्ही कोंडलों; ..
त्या शत्रु-मित्रें नाडलों ! ..
'माय-बापें आमुचीं !..' - ही कीर्ति येथें गाजली;..
हीं मेंढरें कां मारलीं ? ..
आज वेडी आस कां त्यांच्या मनीं फोंफावली, ..
...'स्वगृहीं आम्ही बळी !'

'मुक्त होऊं अन् स्वदेशा सांवरूं !' - कां धाडसें ..
हे बोलती वेडे पिसे ? ..
माय व्याली ना कुणाची, साधण्या अत्यल्पसें, ..
कीं शक्य जें आम्हां नसे !
आत्म-शक्तीच्या चमूला मोल नाही भूवरी —
ही शस्त्र-सत्ता जोंवरी ! ..
वायदे देउं उद्यांचे !.. कायदे लादूं शिरीं !..
अन् फैरि झाडूं जिव्हरीं !!

*

तज्ञ आम्ही शांततेचे ! ... देउं अन्या सद्गती;...
हो,...आमच्या जे मागुती !

काळ जावो वायुवेगें; ... ना मनीं आम्हां क्षिती;
..'ये इष्ट काळीं उन्नती !' ..

चौ पिढ्यांनी काय येई राजनीती, संस्कृती ?
..ती पाहिजे आधीं कृती ! ..

धूर्ततेनें पेरल्या ज्या क्षुद्र आम्ही विकृती ..
त्या त्याच..त्यांना मारती !!

शृंखला लादूं दुज्यांना हांसुनी, या भूतलीं..
..अन् वेडं दीनांचे बळी !

मुक्त आम्ही...जोंवरी ही दासशाही राखली ;..
अन् वित्त-सत्ता चाखली !

आमुचें हें ध्येय,...कीं-"जे राज्य-सत्ता-सारथी...
त्यांनां स्वतःची शाश्वती !..

प्रेम-द्वेषाची तमा न मानिती !,... ना झांकिती...
..ते नीचता वा दुष्कृती !"

*



श्रेष्ठ जें,...वा सत्य जें,. .कीं दुंदुभी ज्याची झडे,..
...जें वानिती चोंहीकडे..

आड ये जों,...कांपतों तें !..चाड ना आम्हाकडे !..
...तें ना म्हणूं हो बापडें !!

क्षुद्र स्वार्थालाहि आम्ही ना कदापी टाळले !...
ते धर्म-बिंदू ढाळले !...

पोळता वासाहि नेऊं !...या घरा संभाळले ...
हो,...तेंच आतां जाळलें !!

[ 'शांतता'!.. 'स्वातंत्र्य'!.. 'सौख्यें'!.. शब्द सारे फोल ते!!
ही लोकशाही झेलते !...

लोकशाही—पाइकांची जेथ सत्ता चालते...
. ती मात्र सत्या जाळते !!..

दिव्य ध्येयें बोलकीं,...अन् हीन स्वार्थाची व्यथा !
हा दंभ माजे सर्वथा !!

...कां करावी मानवानें भूतळीं अशा वृथा ??
..अन् का घडावें अन्यथा ?]

२४
२८ } -५-४३

* * *

रघुवीर सामंत कृत—

* संकीर्ण ललित लेख 'रजःकण'
* नव्या सोज्वळ कथा 'तांडा'
* शद्बचित्रात्मक लघुनिबंध 'तारांगण'

[ गट घेणाऱ्यास विशेष सवलत ]

६

## अंधार ! – का अंधार ?

[ अंधारातून प्रकाश व प्रकाशातून अंधार हा निसर्ग-नियम !-पण . आजच्या या मानवी राज्यांत ?- अंधार ! अंधार !... अखंड घोर अंधारच ! ! ]

[**आधारची बातमी**- "माळवत्या वर्षाचा निरोप व उगवत्या वर्षाचें स्वागत करण्यासाठीं कांहीं काळ 'ब्लॅक आऊट' मोडून, स्वातंत्र्य-देवतेच्या पुतळ्यावर व इतरत्र झगझगित दिवे लावून आपल्या राष्ट्रांतला अंधार अमेरिकेनें नाहींसा केला. कांहीं मिनिटांनीं पुन्हा दिवे विझले;.. पुन्हा 'ब्लॅक आऊट'च्या काळोखाचें साम्राज्य सुरु झालें." ]

**स्थळः**-अमेरिकेचा किनारा... **काळ**:-युद्धकाळ

**वेळ**:- ३१ डिसेंबर १९४२ रात्रौ १२ वाजतां.

[**भूमिका**- गडद अंधारांत उभी असलेली अमेरिकेची भव्योदात्त स्वातंत्र्य-देवता डोळे फाडफाडून काळोखांत सभोंवार पाहोते. पायाखालीं विल्सन, अॅब्रॅहम लिंकन्, वॉशिंग्टन वगैरेंचे तळमळते आत्मे दुःखी चेहऱ्यानें खालीं मान घालून निश्वास टाकीत निःशद्ब हालचाल करीत असलेले दिसतात. स्वातंत्र्य-देवतेचें अंग थरारतें;..ती एकदम सचेतन होते.

क्षणभरांत तिच्या हातांतील ती अजस्त्र मशाल हलते; नी ती देवता उंच उंच होत मशालीसह, अनंत आकाशांत विराट स्वरुप धारण करते.. आणि शेवटीं...

अंधारांत चांचपडणाऱ्या, जीव मुठींत धरून निश्चल पडलेल्या आपल्या बाळांकडे नि साऱ्या जगाकडेच अश्रुभरितपणें पाहून, निश्वास टाकीत तिच्या तोंडून शद्ब बाहेर पडतात— ]



## अंधार!- का अंधार?

या इकडे...त्या तिकडे!..अंधार! कां अंधार?.. (ध्रु०)

सत्ता-मद झाला चोंहिकडे ;..
गत नर-पापांचे भरती घडे!..
पशु-तुल्य घोर मग हे झगडे!!
राख,.. रक्त,.. सांडें दोहिकडे!- अंधार!- हा अंधार!! १

अबळांच्या मुरगाळुन माना,...
...अनुनयें जोडिती शबळांना!
-आळवित बसती देवांना!!
ही नीति जाहली चोंहिकडे!.. अंधार! हा अंधार!! २

महि-तळीं मातले महाबळी!..
स्वातंत्र्य मर्दुनी पायदळीं,..
ग्रासिती दुज्यांचे घांस गळीं!!
मग आज चढे,..तो उद्यां पडे!...अंधार! कां अंधार? ३

गत-काल निक्षुनी ओरडती

'नर-कुंडिं कोटिनें जरि मरती,..

राखेंत निखारे रसरसती !'

मग फिरुन आग बघ चोहिकडे !..अंधार !..हा अंधार !! ४

बघ उडी घातलिस वणव्यांत;..

अरि शिरेल परि तव गोटांत !..

कां डगमगशीं,.. करिशीं घात ??

कर, आज न्याय कर मित्रांत ! अंधार !...कां अंधार ?? ५

स्वार्थ, दंभ,.. जोंवर दोहिकडे ..

फिरफिरुनि सांडतिल रक्त-सडे !..

'मित्रां' चे होतिल शत तुकडे !!

तूं सांवर ध्वज, निष्पाप मनें ! अंधार ?..ना अंधार !! ६



ही प्रेम-ज्योत तव हातांत्,..

कर,..वात आर्द्र कर स्नेहांत !

तळपेल तेज मग जगतांत !!

जग नवें उजळ चल चोहिकडे!..अंधार! कां अंधार ?? ७

"असहाय असे रे नरकाया,

मन धीर, वीर जग जिंकाया !"

—हा आर्य-मंत्र गेला विलया !!

नर-रक्त सांडतां का वायां ?...अंधार ! हा अंधार !! ८

कर धीर !..सोड दांभिक विनया !!

—तीं जातिल साम्राज्यें विलया !

...कां उगा दाविशीं त्यांस दया !

तुज नवें प्रेम-साम्राज्य जगीं !..अंधार ! कां अंधार !! ९

तीं जुनाट नबळीं तव नातीं!

वणव्यांत जळूं दे!-कां भीती?

...परपुष्टां नच हो सांगाती!—

चल्, दीप लाव चल चोहिकडे!-अंधार!..हा अंधार!! १०

हा ऋणी दीन,..अन् हा धनको,..

वा काळा...गोरा...भेद नको!—

—नर माणुसकीवर नर जिंको!...

हृद्—भाव शस्त्र मग मही-तलीं!..अंधार?..ना अंधार!! ११

नव शास्त्रें करतीं जग छकुलें—

...चहुकडे तींच मानवी मुलें!-

—प्रेरणा—भावना एक फुले—

'जग भरो शांतिनें चोहिकडे!'..अंधार!..ना अंधार!! १२



हो अग्रेसर नव-जगताचा;...

...दे मंत्र खुल्या स्वातंत्र्याचा!..

...तो मार्ग सुखाचा!..त्यागाचा!!-

प्रेम,..प्रेम..कर चल चोहिकडे!..अंधार!..कां अंधार?? .१३

तूं कुबेर घरचा,..श्रीमंत!..

..तुज हवे कशा मग सामंत??..

...कर प्रेमानें जगतीं मात!!...

..मग नंदनवन जग!..तूं नेता!!. अंधार!. ना अंधार!!. १४

दशदिशा उजळतिल मग सगळ्या!..

...राखेंतुन फुलतिल नव्या कळ्या!...

...खग स्वैर धांवतिल नभीं निळ्या!!...

—बालकें प्रभूचीं चोहिकडे!.. अंधार!.. ना अंधार!!. १५

जा! ध्वज तेजाचा उंच उभार!..अंधार!..कां अंधार?..

...अंधार!...ना अंधार!!...

नववर्ष-प्रभात १९४३

रघुवीर सामंतांची

उ प का री  मा ण सें

{ १ प्रवासांतील सोबती २ अभ्र —पटल }
{ ३ आकाश-गंगा ४ घरोघरची देवी }

तुम्हाला परिचित आहेत कां?..

एकूण सुमारें ११०० पानांची स्वयंपूर्ण खंडांची

महाराष्ट्राची पहिलीच प्रदीर्घ सामाजिक कादंबरी

[ गटाच्या ग्राहकास विशेष सवलत ]

७

# लखलखते लाख दीप—

[ १५ ऑगस्ट १९४७ ह्या भारताच्या मुक्ति-दिनीं राष्ट्राचा प्यारा तिरंगा सार्थ स्वाभिमानानें लाल किल्लयावर फडकला-फडफडला; श्रमित जनतेच्या डोळ्यांत आनंदाश्रू चमकले; सभोंवार अपूर्ण उत्साह ओसंडला; नवलाईची दीपवालि चौफेर लखलखली. तें सारें अभिनव दृश्य एका बाजूस उभें राहून टकमका पाहणाऱ्या व तो नवखा आनंद अनुभवणाऱ्या हरेक उललेल्या अंतःकरणांत पुढील विचार-भावना स्थिरावल्या— ]

## लखलखते लाख दीप—

लखलखते लाख लाख दीप गगन ल्यालें!– (ध्रु०)

लाख आत्म-त्याग-याग आज फळा आले!—
भिरभिरते दीन, भुके,...श्रमित नयन ओले;
लाखांचे प्राणार्पण, नेत्यांचे संतर्पण आज मूर्त झालें!..

अपमानित,...अवमानित,...
आजवरी जे अवनत,...
ज्यां नच पत, मत,संगत..
नयन तेच,..या निमिषीं मुक्ति-मुखें ओले!– १

छातीवर...भव-सागर;...
..सत्ता-कर..पाठीवर;...
..मत्त-लाथ माथ्यावर!...
तेंच सत्व-शील शीर..स्थिर,..उन्नत झालें!... २

पर-सेवा-रत किंकर!...
—बळकट जूं मानेवर,..
पद पडले ठेक्यांवर!...
चरण तेच आज स्वर्ग-मंदिरा निघाले!... ३



पोटाची टिच-खळगी,...
..नित भगभगती आगी!..
..मेलें मन होत उगी!!..
तेंच सु-मन आज फुलुन,..फिरुन स्वैर डोलें!.. ४

चढला जो अवकालीं,...
साम्राज्य-ध्वज...खालीं!..
जगताचा नव वाली...
वर चढला,...फडफडला!...अंबर वर हाले!!.. ५

वर ध्येयागर-केशर!
–भूवर हे हरितांकुर!...
सत्य,..शील,..धवल थोर!...
गरगरतें काल-चक्र...फिरुन उदित झालें!... ६

'धर्म-वर्ण कुछ्-किंमत,...
...यश त्यांचें...ज्या हिंमत!'
— हें मत ज्यांना संमत,...
जग त्यांचें!..ध्वज त्यांचा...साभिमान डोलें!... ७

३ मन् गटांत गिरण-खाणि!..
२ कसू तिल त्यांच्या जमिनी!!..
१ येथ न किंकर कोणी!...
धन-शाही,...सत्ता-मद,...या क्षणीं निमाले!... ८

भक्तांची घी-शक्कर !...
राजांचे लक्ष्मी-घर !!...
दलितांचे श्रम-डोंगर...
ते डळले...ढांसळले !...समता-युग आलें !... ९

...मानवता—धर्मांतर;...
पांचा-मुखिं परमेश्वर !...
तो उगडी द्धन्मंदिर !!...
शांति-प्रेम-प्रगति हेच देव-धर्म झाले !... १०

माना या ध्येयांना;...
-ना तर उडतिल माना !...
-हटवाद्यांची दैना !!...
नव-युग !..नव-जग !!..सावध !.दुंदुभि-रव चाले !!.. ११

दिव्य भावि-काल पहा !...
नव-देवांचा ध्वज हा !...
विजय गाजवील महा !...
खंडित जग,..खंड-खंड जोडण्यास डोले !!... १२

१५ ऑगस्ट १९४७



## ८

# 'उद्या नाय् !– आज !!–'

[आजच्या किसान-कामगारांचें सांघिक पद्धतीनें म्हणावयाचें जूटीचें अभिनव ढोलक-गीत—]

## उद्या नाय्!..आज !!—

चल् गड्या, मानूसाऽच्या जल्माऽचि धर् जरा लाज् !
आर ऽउट्, उद्या नाय्..उद्या नाय्..उद्या नाय्..आज्!!- ध्रु०

गेलि गड्या, आवऽसेचि काळ्रात्..
बग् झालंऽ..झुंजु मुंजु. आबाळांत्...
भिरऽ भिरंऽ नवं वार दरियात्...
कारऽ आता, मनात् तुफाऽन् तुज्या गरऽगंर आज्?..
चल् तुजि हिम्ऽतीनं व्हडि हान्!..कर्ऽकाय् काज्!!.. १

चलरऽ भाव्, सूऽक् तुजं दारीं हाय्...
उट् उट्...उट्रऽ मर्दा ऊबा न्हाय्...
आरऽगड्या, धीरऽनाय्...धीरऽनाय्..
उट् बेट्या, मानूसाऽच्या हिम्तिने कर तुजंऽ काज!..
उचल् पाय्, म्होरऽहो!..म्होरऽहो! उद्या नाय्..आज!!.. २

संसाराचि रातऽदिस वन् वन्;...
खान्यासाटिं पोरांऽचि भुन् भुन्;..
तुज्या घरिं पन्तींऽचि मिन् मिन्!!
पर् त्याऽ, बंग्लि-बंग्लिऽत् झग्मग् !..शिरा-पुरि थाट!!
आर ऊट्, हिम्तीऽनं म्होरं चल्!..काड् तुजि वाट !!.. ३



घनऽदाटऽ आंबऽराई झाली हाय् ;...
फांदी फांदी फोफावूनऽ ऊबि न्हाय् ...
नको गड्या बांड्गुळांचि करू गय्!...
आर त्येना मरुं द्ये मरऽन् त्येंचं !..मोहरुं द्ये झाड !..
भाव् तुज्या पितरांच्या होलीऽचि धर जरा चाड !!.. ४

गड्या, तुजा पाटीऽराका कोन नाय् ;...
वाटऽमांदी काटंऽकुटंऽ ठाय् ठाय् ;...
ऊबा न्हांय्!. उचल् पाय्!. म्होरंऽजाय्!..
बग् तुज्या कनसाऽळल्या श्येतांत तण् झालंऽ दाट्!..
चल् आदि निंदूऽन-खुरपूऽन कर काटाकाट !!... ५

आरऽतुज्या जिवाऽचं झाल्ं रान् !...
पर् कामा–घामाऽचं वरऽदान् !...
झालि काळ्या भुईंऽचि सोन्खान् !!..
पर तुज्या सोन्याऽचा आजवर परक्याऽला साज् !..
आर आला गब्रूंऽना माज् !..त्येंना पानि पाज् आज् !! ६

पन्  त्येऽ तर खुशाऽल-चेंडु धीट्!...
आरऽ उट्  त्येंना कोंडींऽत कोंडु नीट्!
श्येट्-सावूक्रि-शिर्मूंतिचंऽ करुं पीट्!!..
चल् चल्, आयतोबांचा पुरेऽ  झाला साज् आन् माज् !-
भाव् , तुला भीऽकलाव्या भिक्बाळिचऽ दिस् ग्येले आज!!-७

क्येल्या द्येवा-धर्माऽच्या बाता लय् ;..
पुरे पाप-पुन्याऽचं आता  भय् !...
गड्या, द्येव् सर्गाऽत्ला तुजा नय् !..
आरऽभाव् ,भुईचा पाईऽक् सव्ता द्येव् झाला आज्!!..
आन् उट् , मान्साऽच्या धर्माऽचं कर् आदि काज्!!-८

काम् करि,..घाऽम् काडि..दिसऽरात्—
काम्करी-किसाऽनांचि तुजि जात्!—
चल्  र्  गड्या, म्होरंऽहो गात गात्!!—
आतां धर् हाताऽत हात् निट्!-म्होरंऽ तुजि वाट!..
कर तुज्या छातीऽचा कोट्!...तुजि मान् धर् ताट्!!-९
उट् उट्!..उद्या नाय्..उद्या नाय्..उद्या नाय्..आज्!-
चल् गड्या, मान्साऽच्या हिंमतीऽनं कर् आज् काज् !!..

{ विजया दशमी १९४७



१

# —विश्व-नाथाचा अवतार—

[ अंधारांत प्रकाश,...मातींत विश्व,...विश्वांत अवनी,... अवनींत जीवन,...जीवनांत मानव,...मानवात देव...विश्वाचा नाथ—विश्वनाथ !...त्या विश्वनाथाच्या व त्याच्या जगाच्या जन्माचेंच हें अपूर्ण,...अस्पष्ट शद्बचित्र— ]

१ तम डळमळला!
२ विश्व-प्रसव-वेदना-
३ नियती ठरली!
४ त्यक्ता अवनी...
५ हरपलें श्रेय!
६ नील नभीं ढग...
७ शांती, माती,..उत्क्रांती!
८ सजीवतेचें तेज..
९ जीवन-अंकुर-
१० सजीव माती!
११ मग नर आला!!
१२ युति प्रभावी-
१३ विश्व बाहुलें!
१४ घोर शस्त्र नव-
१५ अति-मानव!

## तम डळमळला!—

अगम्य,…अगणित काळीं—अनुपम—
भयद निनादें डळमळला तम!
तप्त-वायु गरगरले,…फिरले;..
लोह-रसाचे पूर लोटले!

ळळळळले आगीचे गोळे;..
अमूर्त आकाशीं नव बाळें!
मग थिजलीं तीं शत-शत शकलें;—
बघबघतां साम्राज्य ठाकलें!
अनंत आकाशाच्या पोटीं—
अजस्र विश्वाची मग दाटी!

शून्यें अगणित,…
(-'मी' पण मिरवित-)
—भ्रमती डोलत!…
शून्यांमागें एक गती!..परि रूपें होत अनंत!

२६-१०-४५





हा पहिला, हा दुसरा,…तिसरा,…
हां हां म्हणतां,…स्वैर पसारा;…
तेजाचे भिरभिले गोळे,…
अब्ज योजनें आग उफाळे..

अनंत-तम-अवकाशा-उदरीं—
तेजाच्या मग सरीवर सरी!…
पृथ्वी—आप—वायूंचें तांडव;…
लव ना लोपत भेसूर ते रव!
(प्रलय-तृषा अंतीं ओसरल्या,…
विश्व—प्रसव—वेदना निमाल्या!)

अपूर्व घटलें,
(अरूप नुरले–..)
—विश्व विनटलें!..
शून्याचा संसार पसारा,..मिरविति ग्रह-गोल!

२६-१०-४३

## नियती ठरली!

अंतर निरखित अंधाराचें...
भंवरे तरती ते तेजाचे !...
(तमःसागरीं अघटित घडलें;..
..विश्वानें लक्षाक्ष उघडलें !)

ढाळित पळपळ तेज आगळे,..
लक्ष रवींचा मेळा खेळे !
त्या एकेकाभवतीं भ्रमतीं ,...
लवथवतीं,...नव-लोकें जमतीं !
('उत्पत्ती-स्थिति-प्रगती-समाप्ती!-'
..तत्क्षण ठरली अखिला नियती! )

तम मेल्यावर,...
तेजाचें घर !...
तेजा ओसर;...
तेजानंतर पुन्हां तमिस्त्रा !..( तम तेजो-बाळ ! )

२६-१०-४५



## त्यक्ता अवनी—

अनंत नव ब्रम्हांड डोलतें,...
चमचम ताऱ्यांची मग खुलते !
सूक्ष्म-सूक्ष्मतर...हलतो,..डुलतो...
अनंतांतला गोल एक तो !...

[–त्यक्ता, अवमानित, चिर-विरही,...
अजुन अंतरीं जळजळते..मही !..
दिसतें प्रति-दिन प्रखर पती-मुख !–
ओढ उरे;–परि नुरलें तनु-सुख !!–
—पुरा भोगलें जें चिर-मीलन,
स्मरुनी तें सुख झुरते क्षणक्षण !

ती तळमळते,...
पाठ फिरवते;...
निशा दाटते !--
तंव मिळती तिज, बाळ-शशी-मुख-कळा..शीत..शांत!]

२६-१०-४५

## हरपलें श्रेय!

ज्यांना नव नव मधु-कण गमती,
...भ्रमर-सुखावर अविरत भ्रमती!
... पुरुषांच्या त्या नव नव रीती..
...पुरत्या जाणति निष्पाप सती!...

[हृदिं जरि जळतो प्रखर उन्हाळा,..
... सतिचा अक्षय प्रेम उमाळा!—
स्त्रीचे सुख-क्षण,..इच्छा-पूर्ती,..
— सरूप होती!.. सजीव मूर्ती !!.]
पुनर्भेटिचा मुळिं नच चाळा,..
..सवें वागवी चद्रम-बाळा !..

—साध्वी अवनी,
बाल-आननीं ...
पति-मुख शोधुनि—
भुवनें भुवनें हिंडे धुंडत...श्रेय हरपलेलें !..

२७-१०-४५



## नील-नभीं ढग!

युग्र-युग अगदीं क्षण-पळ गमलीं,..
...ऐशीं शत-शत युगें लोटलीं!
वाण न आकाशा,...वा काळा;...
पळतो पळपळ जळता गोळा!

...सहस्र झंझावात उसळले;...
जग-नग-आसन प्रतिक्षण ढळलें!
बाष्पानल-क्रंदन अतिभीषण;...
तेज-तमांचें घोर रणांगण!—
भवतीं भरलीं आगिन-वृष्टी;...
...प्रवास करते जळती सृष्टी!

( विरली धगधग, ..
—नीलनभीं ढग! )
--.युग-क्षण ये मग!...
तमःप्रसव तेजातुन रज-कण भूवर अवतरती!

२७-१०-४५

# शांती, माती...मग उत्क्रांती !

तरिहि धरेचें जळलें अंतर,..
भूवर उल्का झरल्या झरझर !.
करति रजःकण भयकर थरथर;..
वाफ उफाळे जल–वलयांवर !...

...होई क्रांती अनुपम भूवर !..
जलांत पर्वत!..गिरिवर सागर!!..
मग मातीचे थर मातीवर,..
... उठले घोर दऱ्यांवर डोंगर !!-
— जगुनी अवनी युगानुयुग ती ...
...माती, माती,...पुनरपि माती !...

क्रांती-अंतीं,—
आली शांती !...
(..मग उत्क्रांती !!..)
तेज-तमांचें सुंदर मीलन,. भूवरली माती !-

३०-१०-४५



# सजीवतेचें तेज–

[ अशी धरित्री होती जळती;...
अशींच पिजलीं तेजो–मोतीं !
...अशिच सांचली अंतीं माती;...
अशी उगवली भूवर शांती ! ]

तेज तमावर करतें मारा;...
...नभःप्रांगणीं फिरतो वारा !...
अफाट जलधी.. क्षितिजें गिळतीं,..
—अनंत आकाशांत लोळती !..
मातीचा वैराण पसारा,
...सजीवतेचा नच तिज वारा !..

परि ती माती,
तेज–प्रदाती !..
फुलविल धरती !..
सजीवतेचें तेज रसरसें अणुरेणूं–उदरीं !..

१०–१०–४५

## जीवन अंकुर

...धूलि–कणांना,...जलबिंदूना,...
अगम्य अद्भुत नवी चेतना;
तेज-कणांचीं नवनव वसनें;..
..जीव कोंडले अनिल-श्वसनें !–

विभिन्न परमणूचें मीलन!
.. नव्या जगाचें नव उन्मीलन !–
अणु-कण जुळविति माया-धागे;
...जिवंत जग...मग झालें जागें !–
अणु-अणु फुलले अवनी-वरती;...
...सजीवतेला आली भरती !–

तरू-तृणांकुर,..
जलचर,..भूचर !...
जीवन–अंकुर !!...
मातीपोटीं..कोटि-योनिची नव सृष्टी नटली !

१-११-४५



## सजीव माती!

मग चिर–निद्रा–पटलें विरलीं;..
सजीव माती हलली डुलली !..
भू-कण,..जल-बिंदू,..खळबळले;..
.. जडत्व परमाणूंतिल मेलें !..

(—उठले घेउन मग नव स्फूर्ती;...
भ्रमती दशदिश अजस्त्र मूर्ती !
..अफाट जलचर !..भेसुर भूचर !!..
..अभिनव खेचर !..सजीव डोंगर !!..)
—जीवन हीच नवी नवलाई !...
...ना कोणा मरणाची घाई !!

(‘जिवंत असणें,..
जगणें,..मरणें,..
माती होणें !..’)
भयद सचेतन माती ती !..तिज उमज न जाणीव !..

१-११-४५

## मग नर आला —

असलें पहिलें-वहिलें जीवन
...आलें रुपें अनंत घेउन !-
ध्यास लागला मग मातीला;-
...जगण्या-मरण्याच्या नव लीला !.

(मुके मुशाफिर ते भूवरचे;..
सजीव सांचे, .मृण्मयतेचे!..
ना त्यांना मन, मति ना...वाचा !...
वांञ्छा, कांक्षा, पार्थिवतेच्या !!)
—त्याहि जिवांची झाली माती,..
पार्थिवतेतुन पुनरपि क्रांती !—

—मग नर आला !!-
(...देह-मनाला;...
नर – हृदयाला ...
युगें युगें लोटुनी लाभला... अभिनव आकार !!)

२-११-४५



## युति प्रभावी—

रूप सान जरि नर-देहाचें—
जगीं आगळें बळ दुबळ्याचें !...
देह-योजना नच संरक्षक;
...नव्या जगीं हो परि तो रक्षक !

समूह-वाचा-अनुभव-ज्ञानें...
विजित चराचर-राज्य नरानें !...
पशूंत दुर्बळ तनु-बळ ज्याचें,...
...प्रभुत्व त्याचें जगभर नाचें !...
शक्ती-युक्तिची युति प्रभावी !...
—नरा खुलीं नव क्षितिजें भावीं !-

सर सर चढला—
उत्क्रांतीला !...
—जगांत पहिला !...
पशू !..पशूहुन भिन्न जन्मला !..नर नरेश झाला !!..

१२-१२-४५

## विश्व बाहुलें

रजःकणांवर फिरला नांगर;..
कांपे थरथर अथांग सागर !...
चपला दासी;...गुलाम रवि-कर;...
तेजाचे घट फुटले भू-वर !!...

नाक-दुऱ्या वाऱ्याला पडल्या;...
—तुफान-लहरी त्याच्या मेल्या !..
बंध दश-दिशांचे ओसरले;
—आकाशावर पंख पसरले !..
गुपित महिचें उघडें पडलें;...
आसन शेषाचें डळमळलें !...

विश्वहि हरलें;...
मुठिंत मावलें !...
— बनें बाहुलें !!
भुलावणीवर...भुतें भारिलीं मया-सुरें सारीं !—

१९-३-४३



## घोर शस्त्र नव !

"सुखकर वृष्टी करोत भूवर,..
ज्ञान-वेलिचे नवनव अंकुर !"
—हीच मानसीं आस शुभंकर...
"वानर होवो...देव,...धरेवर !"

करुन जिवाचें रान भयंकर,...
रात्रं-दिन झगडती धुरंधर !—
...प्रतिभा प्रसवे अविरत हुन्नर,...
खुलें मयासुर-राज्य घरोघर !..
—येती,.. वर्षति,..विरती,..दयाघन !—
—सुंदर करिती मानव-जीवन !..

स्वयेंच परि ते—
शास्त्र-विधाते,
देति दुज्यातें—
घोर शास्त्र नव!..(तरण्या..सत्ता, धन, आकांक्षा नीच!!-)

२५-३-४३

निर्झरिणींचीं झुळझुळ-गानें;
माळावरलीं मखमल-रानें;...
सडा फुलांचा!..कमळें कोमल !...
... भृंग-भरऱ्या!.. किलबिल!..कोयल !-

तरू-वल्लरी;... हिरव्या राया;..
जंगल-घरच्या मंगल छाया !...
गजबजाटालीं गिरी-कंदरें;...
... भिउन पळालीं हरिण-पांखरें !-
वन-देवींचीं निवास-स्थानें,
— पछाडलीं भसूर भुतानें !-

मानव-करणी !..
...हिरव्या कुरणीं,
इमले-गिरणी !!—
अति-मानव व्हावया सजला..विश्वामित्र दुजा !..

२१-३-४३



१०

## — भस्मासुराचा अतावर —

[ अफाट विश्वाला मुठींत वागवणाऱ्या नि देवांच्या दिव्यत्वालाहि आपल्यीं ज्ञानाच्या प्रभावानें पूर्णपणें झांकळून टाकणाऱ्या नर-विश्वामित्रानें स्वतःचें अभिनव असें एक नवेंच विश्व निर्मिलें. पण त्यानेंच एकदां त्यांत उद्धटपणें निर्मिलेला विराट भस्मासुर त्याच्यावर मात करून अखेर त्याचा व साऱ्या जगाचाच असुरेश्वर बनला — ]

१ अर्धा प्याला !
२ नर-भस्मासुर !
३ राखेपूर्वींचा धूर-
४ तत्वांचें ख-पुष्प-
५ पुंड !
६ गुंड !!
७ 'जिव-लग' भाऊ!
८ स्मशान नर-सदनीं-
९ विजय अणु-स्फोटें
१० लोकशाहिचें स्मशान
११ मढ्यांवर फुलें !!
१२ धर्मास्तव अधर्म-
१३ पंकीं रुतलेले नारायण !

## अर्धा प्याला!

पशू!...पशूहुन भिन्न जन्माला;...
(-संस्कारानें मानव झाला!-)
—पिउन धुंद,..ज्ञानाचा प्याला.;...
—(-प्याला,...पण तो अर्धा प्याला!-)

मग मानव घे उंच भरारी;...
(-निसर्ग-देवांवर ती स्वारी!-)
अमर्याद मन गर्वें चळलें;...
(-ज्ञान-रवि-तपें पंख वितळले!-)
गोते खाउन खालीं आला;...
(-तया पाहुनी पशू लाजला!-)

वाघ-शेळिचा,...
व्याध-मृगाचा,...
बकासुराचा,...
आपसांतला...खेळ रंगला, रक्तानें..अनिवार.!-

१४-३-४३



## नर-भस्मासुर!—

मतिला मानव लावि पणाला;...
(-शत-कर फुटती लोह-कणाला!-)
...धरा थरथरे यंत्र-रवानें;...
(-जीवन पिळती फिरते घाणे!-)

—मग मन मेलें!-दुबळा सांचा!!-
(-नरास जाळे खेळ स्वताचा!-)
भयाण तांडव करि भस्मासुर!...
(-अगतिक झाले..भोले शंकर!-)
..विष्णु,.स्वयें मोहिनीस भुलले!...
(-भस्म उरे जग!.. शिव व्याकुळले!!-)

कोण तारतिल,...
देव महींतिल?...
...असुर संहरिल!-
नर-भस्मासुर करती किंकर नर-विष्णु जगतीं!!-

१९-३-४३

# राखेपूर्वीचा धूर

नभीं उंच अन् वसुधेवरती—
वनांत, तैशी जनासभोंतीं ,...
हिमालयांतिल धूर्जटी-जटीं,..
जलराशींच्या पाठीं-पोटीं...

भिकार रडव्या खेडुत-गांवीं,...
यंत्र-बद्ध शहरी मायावी,
खोपटांतल्या रकट्या-खालीं..
मखमलवाल्या उंच महालीं...
नवळ्या मजुरा-पोटीं, पायीं...
नवकोटाच्या दुबळ्या हृदयीं—

आंच लागली,
आग धडकली;..
नरता पिचली!...
पुरी राख व्हावयापूर्वींचा धूर कोंदला फार!...

१४-३-४३



# तत्वांचें ख-पुष्प

पिसाट धर्म-प्रेमें संगर...
...धर्मांचें जगती अवडंबर!...
देश-प्रीतिचे लेउन बुरखे,...
लोकशाहिचे जयघोष मुखें!—

वर्गावर्गांचें वर बेगड,...
समतेची बहु चाले बडबड!—
कृष्ण, पीत, अन् धवल कातडी...
...वर्ण-द्वेष मातला हरघडी!—
[खपुष्प तत्वांचें...आकाशीं!...
...स्वयेंच नरतेला नर नाशी!!]

येती जाती,...
संगर,...शांति!...
—नच मानवती!!...
पिढ्या-पिढ्यांच्या मानवतेची माती भूवरती!—

१६-३-४३

## पुंड !—

परक्यांच्या घरट्यांवरती —ठेविति तुळशी-पत्र !
दीनां पिळुनी घर भरती! ..(नभीं उडे परि ‘छत्र’!-)
दमांत घेऊन परक्यांना—यांचा नंगा नाच !...
गुंड पेटले आव्हाना !-(तेव्हां पडला पेंच !...)

झोंड दोन पूर्वेकडचे—धीरें करिती मात !—
घर तर यांचें कांचेचें !- (झाला पुरता घात ! )
पूर्व-क्षतें त्या नागांचीं,...त्यांत महत्वाकांक्षा !—
खंत न धरती रक्तांची !- ( उतरवण्याला नक्षा !-)
कांगावा यांचा मोठा-‘लोकशाहि–कैवारी !’
अवचित् विद्युत्-वरवंटा !-( आली यांना घेरी ! )
शतकांचीं पापें काळीं..क्षणिं मग उघडीं पडलीं !...
‘एक हातची टाळी’!...नभामध्यें कडकडली !

[“कैवारी ना दीनांचे ??—घ्या तर त्यांचा घात !!”
—आणि धुमसत्या आगीचे...जगीं उसळले झोत!!]

२८-३-४३



## गुंड !

“हृदयिं पटलों सूडानें–‘फिरुन होऊं बलवंत !’...
-पिसाट ठरलों जन–नयनें - अम्ही आर्य भगवंत !!
कलावंत अन् शास्त्रज्ञ;..दिलीं जगा नव-क्षितिजें !..
अतां मांडला नर-यज्ञ !..नौबत अमुची गाजे !..

वीर-धीरु अम्हि समय-ज्ञ !..अम्हां दया ना माया!..
निर्णायक जर नर-यज्ञ ...उभवुं मृत्युच्या खाया !!
हो, जन नेत्यांच्या भजनीं !.. राष्ट्रच अमुचा धर्म !
शास्त्रें योजिति दिन-रजनीं ...नव नव ध्वंसक कर्म
सोंग कशाला सिंहाचें ?.. जगीं माजले पुंड !.
फुगे फोडुं अम्हि दंभाचे !..म्हणा अम्हाला गुंड !! .
सज्ज सदा !..सुख रण-मरणीं !..शिलेदार शिस्तीचे !..
बाल्य लोपलें अपमानीं !...बाळ-कडू युद्धाचें !!”

[ सुखासीन मग जे त्यांचीं...‘तेजस्वी माघार !!’
झुंज आजवर परक्यांची !...थरथरले वाग्वीर !! ]

२०-३-४३

## ‘ जिवलग ’ भाऊ !

“ सडे शिंपिती रक्ताचे...नर-राक्षस मोकाट !..:
आसन ढळलें तख्तांचें...करा छातिचा कोट !!-
जगा धटिंगण देति दगा...नरक उभवुनी जेते!!-
लोकशाहिच्या सुख-स्वर्गा..कोण अम्हांविण त्राते??-

( परंपरेचे पथ आमुचे..‘ मित्र ’ परी जगताचे !-
वाली सत्याचे सच्चे !- झेंडा जगभर नाचे !!- )
काळे !..गोरे !..या सारे !!..आज कशा आकांत ?...
आधीं अरिचें मोतेंरें !...उठा,...वीर विक्रांत !!...
सुखें वर्षतिल जयकालीं !-भाकर मोडुन खाऊं !!--
‘पांच-आणि-शत’ या कालीं-आपण जिवलग भाऊ!!-
पणास लावा नर-राशी !..आपुलीं नातीं-गोतीं! -
(उभे आम्ही तट पाठींशीं !)..जगांत वितरूं शांती!!-

[अंबर भरलें बकव्यानें-“ आम्ही संगर जिंकूं !!”
जगिं न शांति परि विजयानें;...सारे सुफेत डाकू ! ]

३१-३-४३



## स्मशान नर-सदनीं

लांखवार,. अन् प्रति-वार,. चुरस चालली नाशाची !-
मस्त पशूंचा संचार!...नीती ठरली ठोशांची!!-
न्याहाळते नभ नर-दृष्टी;...अस्थिरतेचा शर जाचे!-
स्फोटक द्रव्यांची वृष्टी;...द्रव्य आटलें धरणीचें!!-

बोचिराख मानवी घरें!...धूरस झाल्या दिशा-दिशा!-
उफाळले भेसुर वारें...सहस्त्र-लक्षांचा फडशा!!-
स्मशान नर-सदनीं पसरें...जीव प्रतिक्षण तगमगला!-
भरल्या शेतीं राख उरे...पोट लागलें पाठीला!..
तुरुंग झाले राष्ट्रांचे...महा मरण जगणें जैथें!..
जगीं राज्य मुत्सद्यांचें!...-मुक्या मेंढरांचे नेते!!..
प्रलयाला आला पूर...खदखदाट झाला जहरी!..
भाटांचे भेसुर सूर...नभांत दुमदुमल्या लहरी!!-

[हुरहुर दुबळ्या हृदयांत!..जीविन कृत्रिम बधांचें!-
तेज न उरलें जगतांत!...वलय दिव्यांना बुरख्यांचें!!-]

२८-३-४३

## विजय अणु-स्फोटें—

मानव–जीवन झगडा!...झगडा !!...
—नर-पशुचा रणिं सदा चौघडा!...
भूवर ठरला संहारक नर !...
..उग्र,..उग्रतर !..क्रूर,..क्रूरतर !!–

रणांगणींचे खून भयंकर...
देश–प्रीतीचे ठरले निर्झर !—
...रात्रं–दिन रक्षामय घरटीं...
...संगर झाले... ‘तत्वा ’साठीं !!—
पशुत्व रचवी हलकल्लोळा ;...
..मानवतेचा..चोळामोळा !!..

...‘तत्वां ’स्तव ‘पण ’;...
...भूवर भुणभुण !—
... पहा !...पहा पण—
विजय लाभला लोकशाहिला भीषण अणु-स्फोटें !-

२४-१२-४५



## लोकशाहिचें स्मशान !

अत न ज्ञाना, ना विज्ञाना !—
हमलें झुलते...चढले गगना !...
—परि ढांसळले, ढासळले रे...
...मानवतेचे उंच मनोरे !!–

रानवटांना जे जे हसले,...
...लोकशाहिचे बाले–किल्ले—
ते नर–रक्षक,...भक्षक ठरले !
—अणुस्फोटांना स्वयें प्रसवले !!
माणुसकी मग नुरली बाकी ...
—हिरोशिमा !... अन् नागासाकी !!–
ढवळ्यांची ढवळी दिपवाळी !—
रक्षा काळ्यांची ही काळी !!—

[ लोकशाहिचें स्मशान सजलें !–
...नर–नरतेचे धूर पसरले !!— ]

५-११-४६

## अधर्म धर्मास्तव !

"बेड्या तुटल्या !- फुटतिल कारा !!-
लोकशाहिचा पहांट—वारा !—"
...भेसुर यादाविचे परि वारे...
वर्षति मुक्तीवरति निखारे !!..

आया - बाया - बाळांचे बळि !-
प्रतिपद रक्तांचीं थारोळीं !!-
सुरे - कट्यारी,..घेउन - देउन ,...
विष-वल्ली मन !..विषमय जीवन !!.
धर्मास्तव जंव अधर्म उठला ...
...मानव मानवतेला मेला !
मग कलकत्ता !–अन् नवखाली !!
धर्महि लाजे त्या अवकालीं !!

[ स्वातंत्र्या !...तव नवे मनोरे ...
असेच प्रतिक्षण ढळतिल कारे ? ]

५-११-४६



## पंकीं रुतलले नारायण !

अन्न न, वस्त्र न, व्याधी नाना,...
ज्या दुबळ्यांना, ज्या दीनांना,...
स्वार्थ–दूहि...अन् संदेहाचें...
...बाळकडू ज्या परवशतेचें !!-

मऊ मेंढरें !...क्षुद्र जीवनीं...
..मरणें जगतीं मानव म्हणुनी!..
पिढ्या–पिढ्यांची पडे आहुती;...
..नेत्यांची त्यांच्यास्तव माती !!—
"होम होउं द्या आपुला!..त्यांना..
मणके देऊं!...उन्नत माना!!...
...पंकीं रुतलेले नारायण!!!
करूं फिरुन त्यां स्वत्व-परायण!"

[—त्या पुण्याचे आज मनोरे!...
...असेच प्रतिक्षण ढळतिल कारे ?]

५-११-४६

मुत्सद्यांची जात कावळी,...
अघोर स्वार्थें दृष्टी पिवळी !...
मानकरी !–मानाची वांञ्छा !!...
(...मान करीं राष्ट्रांची त्यांच्या!... )

पिचूं लागतां, तत्वें,... राष्ट्रें,...
—एकमेव ते रक्षक द्रष्टे !
मुद्दे त्यांचे जंव गुद्यांवर,...
...जगांत धडके भीषण संगर !!...
जनता त्यां मग मऊ मेंढरें !...
—" मरोत मरतिल रांडा-पोरें !...

शांतीनंतर...
फुलें मढ्यांवर !..."
( — विजय–क्षणींतर...
हेच मान धन पुन्हां लावती तत्वां अंगार !!—)

२४-१२-४५



११

# — आंधळ्यांची माळ —

[ आंधळ्यांच्या माळेला कोणीतरी म्होरक्या लागतो; चांचपडत पुढें जायला कसली तरी काठी लागते; एकमेकांच्या संगतीनें तात्पुरता धीर वांटतो मनाला —

मानवी समाजाच्या आंधळ्या माळेचीहि हीच स्थिती आहे. वेळोवेळीं एखादा तरी डोळस म्होरक्या लाभतो; एखादी तरी तत्वाची बळकट काठी सांपडते; सारेच चांचपडतात म्हणूनच केवळ प्रत्येकाला आपण डोळस असल्याचा भास होतो.. आणि म्हणूनच ती आंधळी माळ आजपर्यंत चालत आली आहे;... पुढेंहि तशीच चालत राहणार आहे—

तथापि, वर्तुळांत फिरणाऱ्या वाटोळ्या पृथ्वीवरील साऱ्या जीवांच्या साऱ्या हालचालीहि वर्तुळाकारच!- उत्पत्ति अणूंतून!.. समाप्तिहि त्या अणूमध्येंच !!— ]

१ फुला फुलांवर जहर
२ स्वप्न भंगलें !
३ विभिन्न विश्वें-
४ दुबळा देव !..
५ दूर उधळला-
६ दुबळ्याचें बळ !
७ भोंवऱ्यांत-
८ झांपडले डोळे
९ अनंत क्षितिजें !
१० देव जगाचे-
११ वाग्देवी !
१२ नराचें अस्त्र !
१३ फांसहि भूषण !
१४ जीवन-कवि !
१५ दीन कवि !—

## फुला-फुलांवर जहर–

जग वसवी जीवांची वसती,...
प्रेम, शांति, सुख, त्याग बरसती !–
...बांध उभारुन चौ–बाजूला,...
आंत सुगंधी बाग बहरला ! –

—परी अंबरीं भरलें वारें,
...सुमन–शिरांवर कंटक–भारे !—
सर सर फिरले नाग धांवरे,
फुलां-फळांवर जहर फवारे !—
हताश, निर्बल,...निर्मल सुमनें...
हेरूं लागलीं वरली गगनें !...

( स्वर्ग भासला,...
देव गवसला !...
—'दर्यांद्र हसला!' )

टाकिति माना शिला-शिरीं मग सुन्नमनें सुमनें!-

२२-३-४३.



## स्वप्न भंगलें —

रात्र मनोरे रंगवि मनहर,
दिव्य धुंक्यांनीं अवनी धूसर !–
[ 'ताजी भाकर!'.. 'सदन खेळकर !'...
'धन,.. सत्ता,.. अन् चरणीं किंकर !!' ]

'फुलति फुलोरे !.. उललें अंतर !!.
'उद्यां आजहुन असेल सुंदर !!'
–परि चांद फिका !- तारे लपले !!.
...दग मनाचें स्वप्न भंगलें !..
... जड जीवांच्या क्षितिजावरती ..
... क्रूर रवीची जळती भरती !!.

सरतीं नातीं ...
निढाळिति मोती,...
सोनें माती !!..

कास प्रभूची धरुन धावती रंक-राव सारे !..

१८-३-४३

## विभिन्न विश्वें!

गिरी-शिरिं खपला ग्रीष्म कुणाचा:...
(..मळा शिंपला कुणी घामाचा!)
...अंबर बरसे छत्रपतींवर;...
(..प्रलय कुणाच्या चिमण्या भूवर!)

पिठाळली शारदीय ज्योत्स्ना !...
(दीनां तळमळ,...वखवख, तृष्णा!-)
हिम-वृष्टी!..अति शीत ! कुडकुडे!..
(...ऊब कुणा!..कुणि जगण्या झगडे!..
वसंत श्रीमान्..मदन संचरे!..
(...कुणा हृदयिं परि राख निखारे!)

निसर्ग प्रेमळ...
एकच निर्मळ—
देइ कृपा-जळ!–

वानर नर,..परि विभिन्न विश्वें विषम जगीं करतो !

२२-३-४३.





धन धनिकाचें ?...(तेज तमाचें !!..
...सजीव कातळ राउळ-तळचे !! )
मंचक सजला मउ गिरद्यांचा...
(...स्वेद-बिंदु अन् रक्त-कणांचा !! )

रमवि रमणि हा आभरणांनीं...
( ...ते पद भरले चिर,...बेड्यांनीं ! )
( सुधेंत याच्या, त्याचे आसू...
...विलास-लोलुप, रक्त-पिपासू !! )
" विटलों अन्ना !.. जर्जर काया !!"
(—'दे रे...भाकर पोरां,.. राया !!' )

धनिकांचें सुख...
दलितां तें विख !..
..बिडाल-मूषक !!..

साधिल कां दोघांचें हित-सुख, एकच दुबळा देव !!.

१८-३-४३

## दूर उधळला-

सजीव पुष्पांची पायघडी...
माळ मोजते राम हरघडी !..
—[पूर्वज कुणि व्यसनांचे आगर...
...कुणि दुबळ्यांवर फिरविति नांगर !]

पूज्य परी रक्षक शतकांचा –
भार वाहतो फला-फुलांचा !..
[कोष रेषमी वर दंभाचा...
.. तयां सूर्य तो अंधाराचा !]
– मिरास त्यांची पिढ्या-पिढ्यांची !.
होती मूर्तीं ती धोंड्याची !!.

धीरें उठला,..
.. धरि तख्ताला,..
दूर उधळला !..

.. वातावरणीं देव विखुरला,.. जिवांजिवां हृदयीं !.

२२-३-४३



## दुबळ्याचें बळ—

जड-भूमीवर तृणांकुर डुले..
(..क्षुधित मृगाचे मानस खुललें!)
हरिण-शावकें स्वैर धावतीं...
(..डरकाळुन वनराज गरजती!)

...सहर्ष गिळलीं!..भक्षक धाला!!-
(–नर-व्यधाचा त्यावर घाला!)
रानवटीं जे राजे दुर्धर,—
—तया संस्कृती करते किंकर!-
[अन्न जगीं या जीव जिवांचें!-
...बळ दुबळ्याला संतत जाचें!!

(गज–सिंहावर,
...देह–बळावर,..
मात करी नर!-
भाषा, विद्या,..यांवर दुबळा नर नरता पावे!-

२५-३-४३

## भोंवऱ्यांत-

अथांग वसलीं दो बाजूनें ...
किर्र, घोर,.. अंधारीं रानें;...
आदि-अंत ना ,.. मधुनी धांवत,...
प्रवाह वाहे,.. अविरत गरजत !..

सुम-पाचोळ्यावर ऐल-तिरा ...
अगम्य गिरगिर भरला वारा !..
भोंवऱ्यांत भिराभरती बुडती,...
प्रवाह धरुनी प्रवास करती!–
प्रवाह–पतितांची ती भरती!!–
...तरुन प्रयासें पैल गांठती!..

—फिरवुन नियती,...
...जलौघ–प्रगती...
कुंठीत करती!...
वीर धीर कुणि, उत्पथ धरुनी,उच्च-पदा वरती!.

२४-३-४३



## झांपडले डोळे.

उंच उंच पसरल्या सभोंतीं...
गतानुगततेच्या त्या भिंती;...
झांपडले डोळे मिरभिरती
कितीक चिणुनी आंतच मरती !—

..अंध–मालिका पोटा–पाठीं..
जगते,..मरते,..चढते ताटी !—
...हृदयीं थिजल्या रम्य भावना!...
वाचा बसली !...विचार लव ना !!—
...लोकमताचा बुरखा काळा ..
नव्या जगाला मिटला डोळा !! —

स्वप्नें सुंदर,...
दिव्य मनोहर;—
स्वर्ग महीवर —
फुलविति...नेते, ज्ञाते, कवि जे...तेच तेच दिव्य !..

१५-३-४३

## अनंत क्षितिजें—

डळमळत्या आचार–शिलेवर...
एक पाय ठेउन उभा नर !...
विचार–शीलेवर अभिमानें...
दुसरा पद स्थापुन धीरानें...

दों दगडावर पाय ठेवितो,...
डळमळतो अन् गोते खातो !...
...होइ पुढें परि...तुडवुन रानें;...
...नच डगमगतो !...भेदी गगनें !!...
विचार–द्रष्टा अविरत झुंजे !...
...कवि-सृष्टिला अनंत क्षितिजें !!...

आचारालां...
स्थिर करण्याला,...
विचार पहिला !...
नव सुमनांना उधाळित जगतीं जगती,..ते वाग्वीर !!..

२५–३–४२



## देव जगाचे–

विविध रसांच्या नद्या मिळाल्या—
दिव्य–प्रेरणा–वृष्टी झाल्या;...
...मानवतेचा क्षीर–सागरीं,...
अनंत रत्नें लपलीं उदरीं !...

[असंख्य मानव जीवन जगतीं...
भाव–तरंगें बुद्बुद् उठती;...
विचार-वीची फेंस सांडती,...
नश्वर तीं..वरवरचीं मोतीं !!]
—भाव-विचारां मुरडुन–दुमडुन...
भाषेचा मंथानहि मांडुन,...

मंथन करिती,...
रत्नें हातीं !...
अवनी भरती !!...
दिव्य जीव !.. ते देव जगाचे !!..धरा स्वर्ग करती !!..

१४–३–४३

भूका पार्थिव विणती जाळें,..
जड देहाचे अगणित चाळे!..
नव नव अनुभव घेई मानव!..
—क्षणाक्षणाचे कुठले आठव !!–

परि अनुभूती दिव्य, भव्य, ज्या,..
–करिल गिरा त्या अनंत, ताज्या,..
जमविल सारी मिरास अपुली,..
अज्ञात कुणा करण्यास खुली!!-
ती मातीच्या सीमा लंघिल;...
युगा-युगांचीं निमिषें विरतिल!!–

मानवतेचें;
दहिवर वरचे,...
चुंबन...नाचे!...
कितीं जगें, किति युगें गुंफिते सुमनें वाग्देवी!!–

१७-३-४३





परम पुण्य,..वा अघोर पातक,...
सुधा मधुर,..वा सोमल घातक,...
जड वाञ्छा,..वा...दिव्य–दर्शनें,...
—भेदुन जातीं जीं षट्–भवनें—

अगम्य,..अस्फुट,..हृद्–लहारींचा...
व्याप करी नव, अनुपम..वाचा !...
जिवा जिवांचें जडवी नाते !...
शस्त्रहि स्फोटक धिक्कारातें !!—
काल–गती नियतीही दुबळ,...
तृण-वत् करते जगतीं तनु-बल!!–

जगभर नाचे!..
—मानवतेचें
अस्त्र नराचें–!-
पशुवत् झगडति आपसांत परि वाचा-मंडित वीर!–

२६-३-४३.

## फांसहि भूषण !..

तन, मन, धन,...धीरांचीं हवनें !...
—उजळति अवनी ज्ञान–रवीनें !—
सहज प्राशिती जहरी गरळें,...
जगता देती अमृत–प्याले !!—

पर–सुख ज्यांचें जीवन जगतीं,...
वज्र तयांच्या अस्थिहि होती !!—
घर करती चिर नरवर कारा;...
पुरलें अन्न तयां जल–वारा !!...
मुकुट,–वांट कांट्यांनी भरली;...
जीवन–यात्रा फांसावरली !!...

तेज–प्रदाते,...
(स्वतः जळति ते;...
गिळती तमातें !)
उजळति भवनें !–फांसहि त्यांच भूषण नर-हृदयीं!!–

२५-३-४२





'नरेंचे केला हीन दीन नर!'
धीरें सांवर!..अश्रू आंवर!!..
रक्त घळघळे पदापदाला;...
जीवन-पथ कांट्यांनी भरला!!...

बध्द मन ज्यांचे अबलख-घोडे...
–लाथाडिति स्वार्थाचे खोडे!...
ध्येय-सृष्टिचे बाके ईश्वर,...
(-झुंजुनि अपुला जीवन-संगर-)
–दिनां देती पक्ष, पाद, कर!...
आणि आणिती जगतिं परात्पर!!..

वीर धीर ते...
अमर ध्येय तें...
जगुनी पुरतें—
मरणा वरती, दिव्यें जिंकित!..जीवन-कवि थोर!!-

१४-३-४३

## दीन कवि!

इथें दीन पण ' कवी मंडळी '...
खिशांत कवितांची भोंडोळीं !...
तुच्छ लेखतिल ते गद्याला ...
वाचतील मग गद्य पदाला !...

कुणा प्रियेचा बाण लागला;...
कुणी कपोलामधें गुंगला;...
कुणास पुरली, कृष्ण न् मुरली;...
छत्रपतीची कुणा साउली;...
वीर कुणी ' कर-पाशिं ' गुंतला;...
गूढ-गुंजनीं कुणी झोंपला !...

( असे भोंवरे...
' कविवर ' सारे !... )
— रसिक बावरे !...

" अशीच का गवसणी घालतां आकाशा, वाग्वीर!!"

१४-३-४३



१२

## रक्त....नि....शाई

[ रक्ताच्या एकेका थेंबावर आजचं जग जगतं;... त्यांतच तें सामावलेलं असतं!– पण शाईच्या एकेका थेंबांत भावी अनंत जगं लपलेलीं असतात; त्याच्याच प्रभावावर...आजच्या अपूर्ण जगाचा त्या उज्वल भवितव्याप्रत शीघ्र प्रवास होतो !—]

१

माझ्या जीवा—

तूं असलास काय नसलास काय...जगाला दोन्हीं सारखंच !- तें कधींच थांबत नाहीं—

तरी पण समाधान मान—जीवा, तूं अजून जिवंत आहेस !

...आणि म्हणूनच तर तुला तुझं जग आहे.

मरण हें आश्चर्य नव्हतं,.. असा काळ तुझ्या अंगावरून भरारत गेला;..अजूनहि तो तसाच पुढें चालला आहे !-म्हणूनच तर समाधान मान—जीवा, तूं अजूनहि देहाला धरून जिवंत आहेस!-

२

जीवा—

तुझ्या डोळयांच्या बुबुळांचे कांचेरी मणी झाले नाहींत; त्यांच्या काळोख्या खांचा झाल्या नाहींत;- म्हणूनच—तुझ्या चिमुकल्या जगाकडे—तुझ्या प्रिय माणसांकडे--अजूनहि,... मंदमंद कां होईनात – दृष्टि–क्षेप टाकूं शकतोस तूं...

अविरत गडबडघाईनें,...भयानक आवाजांनीं,....भेसुर किंकाळ्यांनी...तुझे कान बहुतेक बाधिर होत आले आहेत;...तरी ते ठिकाणावर तरी आहेत. म्हणूनच, तुझ्या चिमुकल्या घरकुलांतल्या निष्पाप बालकांचे बोबडे लडिवाळ शब्द तुला आजहि



कधीं मधीं ऐकतां येतात; ते आनंदवूं शकतात तुला...

भोंवतालच्या परिस्थितींतल्या धूराशिवाय नि सडल्या शोणित-मांसाशिवाय तुझ्या नाकाला दुसरा वास येऊं शकत नाहीं; पण प्रयास करून तरी,...अधून मधून कोमल फुलांचा मधुर वास अजूनहि तूं घेऊं शकतोस !–समाधान मान...

३

जीवा—

तुझ्या तोंडाचा दांत विचकणारा भेसुर जबडा झालेला नाहीं; तुझ्या बोटभर जिभेला अजूनहि थोडी फार चव आहे— म्हणूनच, मुठी–मुठीनें नि उतरत्या भांजणींत मोजून-मापून दिलेली माती—अन्न म्हणून तोंडांत ढकलून,...तूं तुझी भूक भागवतोस;...पोटाची खळगी थोडी तरी भरूं शकतोस !—

आणि...आणि...परिस्थितीबद्दलच्या सात्विक संतापाचे चार दुबळे निरर्थक शब्द..आंतल्या आंत विझलेल्या स्फुल्लिंगांच्या सूक्ष्म कोळशांप्रमाणें...तोंडाबाहेर फेंकून, तूं मनांत क्षणभर समाधान मानूं शकतोस !—

तुझ्या हृद्-भावनांची तर माती झाली आहे; तरी तुझ्या हृदयाची अजून गती थांबलेली नाहीं; तें अजूनहि हलत आहे;... म्हणूनच,...आज पदोपदीं भयभीत झाल्यावर...तें धडधडूं तरी

शकतं!...आणि हरघडी पळतां भुई थोडी वाटली,..तरी पळण्या-
इतकं पायांत त्राण आणायला-ठेवायला,...नसानसांत...आहे
तेवढंच तुटपुंजं रक्त तरी फिरवूं शकत आहे तें...

४

जीवा—

ज्याचा तुला मोठ्यांत मोठा अभिमान, तें तुझं उत्तमांग!
तेंहि अजून ठिकाणावर आहे...

आंतला मेंदू अव्याहत गरगरत असला,..विव्हळत असला,..
तरी तुझं डोकं जाग्यावर आहे! तसं वरवर पहाणाऱ्या भोंवताल-
च्यांना तरी दिसतं-वाटतं;..म्हणूनच ते म्हणतात तूं जिवंत आहेस;
—तूंहि म्हणतोस ते जिवंत आहेत!...

पण तुझं डोकंच उडालं असतं-आणि तें त्या गेल्या काळांत
केव्हांहि अशक्य नव्हतं—तर तुझ्या मेंदूची एव्हांना मातीच
झाली असती;...तुझ्या बुद्धीची आजची ही भेसूर दीन हालचाल
आणि प्रतिपद होणारी कठोर गळचेपी तुझ्या वांट्याला येती ना!
तुला तुझं हें आजचं मरण जगावं लागतं ना!...काम करतांना
थरथरणाऱ्या,...क्षणोक्षण कांकूं करणाऱ्या,...तुझ्या हातांना
कायमचीच विश्रांती लाभली असती!...



जीवा—  ५

...आणि...लेखणी धरून घट्टे पडलेलीं तीं..तुझीं अव्याहता
भरकटणारीं बोटं!..पिचून चुरा होऊन...कुठल्या तरी नदीच्य
पोटांत...नाहीतर भूमीच्या उदरांतच शिरलीं असतीं तीं...
तुझं मन;..तुझा देह,..तुझं रक्त..या ना त्या प्रकारें...अनंतात
विलीन झालं असतं!...नि जगांतली सेरा शाई...तुझ्यापुरती
तरी...साऱ्या दौती-दौतींत कोंडून पडली असती!...
या कोऱ्या कागदांना...तुझ्या भावपूर्ण मूर्खपणाचं,...तुझ्या
प्रामाणिक सत्प्रवृत्तींच,..तुझ्या तीव्र इच्छा-आकांक्षांच...निरर्थक
ओझं वाहाण्याचं कारणच उरलं नसतं...

६

पण जीवा—

तूं जिवंत आहेस!...हो, जिवंत आहेस!...
भोंवतालच्या परिस्थितीच्या,..वैभवाच्या,..भावनांच्या,..ध्येयां-
च्या,..भवितव्याच्या,..भयानक..अपूर्व काळ्या बाजारांतहि .तुझ्या
देहाच्या काठीला धरून...कधीं मंद मंद तर कधीं तरुं तुरुं पावलं
टाकीत, तूं तुझ्याच जगांत भ्रमिष्ठासारखा अजून भ्रमत आहेस!
आज तुझा देह तेवढा निव्वळ हाडांचा..काठीसारखा होत

आलाय्!..पण तुझ्या हडकुळ्या हातांत,...आजहि...साधी काठी देखील नाही!...तुझ्या सत्प्रवृत्तीच तुला लगाम घालून खड्या आहेत!... त्यांना पदोपदीं पायाखालीं घालणाऱ्या या भयंकर जगांत,...तुझ्यावरील त्यांच्या हुकमतीमुळेंच,..क्षणभर दुबळा झाला आहेस तूं;...दुबळा ठरला आहेस तूं!...

म्हणूनच, जीवा, उघड्या निस्तेज डोळ्यानीं,.तुला हें सर्व पाहावं लागतं!...तुला कोणाचं रक्त सांडवायचा अधिकार नाहीं;...तसा वांव नाहीं...धीर नाहीं...

आणि धीर केलास तरी कोणाचं रक्त?..तुझ्या बांधवांचंच?... कशाला?... कसं?... कां??... तें आहे कोणाकडे??... तुझंच सांडवायचं म्हटलस...तरी तुझ्याकडे तरी आहे कां तें??..

असा सर्व बाजूनें तूं झिजत आहेस,..जळत आहेस!.क्षणाक्षणाला तुझं रक्त थेंबाथेंबानें...ओंजळीओंजळीनें...आटत जात आहे.

७

**जीवा—**

जीवा!—म्हणूनच,..तुझा थरथरता,..अगतिक उजवा हात,.. तुझ्या हक्काच्या शाईकडे वेळोवेळीं वळत आला,..वळत आहे.. आजच्या या परिस्थितींत,..(वाऱ्यावर फडफडणाऱ्या आजच्या कागदासारखंच...) तुझं मन मलिन—मळकट झालं आहे!.. तरी



त्याच्या उरल्यासुरल्या चिंध्यांवर,..मन:शांतीसाठीं,..शाई तेवढी मनसोक्त सांडवून पाहतोस तूं!..

...पण:.पण..आधींच पुसट अशी ती तुझ्याहातून कागदावर उतरणारी शाई!..तुझ्या भडकणाऱ्या मनांतून स्त्रवणाऱ्या नि अखेर डोळ्यांवाटें बाहेर ओसरणाऱ्या अश्रूंच्या सरांनी ती क्षणोक्षण पुसटलीच जात आहे!..

तें रक्त!...ही शाई...

फक्त रक्त?—नाही, शाईहि!..साधी नव्हे...रक्ताळ!..स्व-रक्त नि रक्ताळ शाई!!—

८

**जीवा—**

मधल्या त्या काळांत..अनेक जागतिक घडामोडी झाल्या:... अज्ञात मानवांचे,..शेजारच्या बांधवांचे,...घरच्या स्वकीयांचे,.. फार काय माय-भूमाचेहि अखेर तुकडे तुकडे झाले!...

ती भीषण लढाई..आली;..का कोण जाणें! मग गेली;..कशी नि कशाला...कोण जाणें!...

स्वदेशांतही प्रचंड लाटा उठल्या;..उंच उंच..उत्सहाचीं नि खोल खोल..निराशेचीं..आंदोलनं आलीं नि गेलीं!...नि अखेर? स्वातंत्र्य..हो, आलं..तेंहि आलं!..डोळ्यांनी पाहिलं-वाचलं;...

कानांनीं ऐकलं;..हृदयानें क्षणकाळ चुणुक अनुभवली देखील...

पण त्या स्वातंत्र्याचा आत्मा?-ती नवी ओळख? जीवाला ती पटली नाही अजून— तर मग तें कोडंच !..पण...

आज तरी जग अधिक चांगलं झालं आहे थोडंच?. पृथ्वी-पाठीवरला प्रत्येक सामान्य जीव...आजहि...होता तिथंच...नि होता तेवढाच..परिस्थितिहातचा एक अगतिक हतबल बाहुला!..

९

जीवा—

आणि तो जनता-जनार्दन?..ती मानवता?..आहे कुठं मानवता? कुठं जात आहे मानवता?? पण मग..झाला तरी कशाला एवढा मोठा भयाण- भेसुर.. रक्त-राखेचा... तांडव-संगर ??..नि निरु-पद्रवी पडोशांचं अमानुष हनन?..बाला-सतींचं पाशवी पावित्र्य-विडंबन?..निष्पाप अज्ञान अर्भकांचं क्रूर कठोर कांडण?..उद्ध्वस्त घरटीं-वारुळं टाकून, जीव घेऊन वाट फुटेल तिकडे पळत सुट-णाऱ्या..मानवी मुंग्यांच्या मैलोमैल पसरलेल्या रांगांचं आक्रंदन?–

हाडांच्या सांपळ्यांनी भरलेलीं तीं घरं-दारं,..रस्ते-शेतं !..तृप्त कोल्ह्या-लांडग्यांचा तो उन्मत्त नाच !....गिधाडा-घारींच्या भेसुर भराऱ्या!—मानव-देही नंग्या दानवांचा आसुरी खदखदाट !!-

याला कारण ?—अगम्य नियति ...कीं...अदम्य नर ?—



...नर-वर कीं नराधम ??...

सत्प्रवृत्तांच्या पुण्याची परिसीमा..कीं पिसाट पापी करंट्यांच्या पशुत्वाची नीच घातकी फसवीं जाळीं ??...

१०

जीवा—

तरी पण त्या मधल्या धुमश्चक्रींत लाखोंनी लाखांचं...नि स्वतःचं...रक्त मात्र सांडलं-सांडवलं !...

गेले !- ते गेले...जगातून कायमचे गेले !!—

तें— आपापल्या तीव्र उत्कट ध्यास-ध्येयांचे बरे-वाईट छोटे-मोठे त्यागी हुतात्मे —

ते— दिवसाढवळ्या खून झालेल्या मानवतेची...अखेरची घरघर एकून,..तिला घोटभर पाणी पाजायला धावून पुढें सर-सावलेले जिवंत धीर-वीर—

ते— मानव-निर्मित क्रूर पाशवी परिस्थितीचे...हतबल,... अगतिक दीनदुबळे बळी—

हो,.. ते सारे...सारे गेले!...हकनाक गेले!...पुन्हां कधींहि या जगांत न यायला गेले !!...मानवाला मानवासारखं जगतां येत नाही,..म्हणूनच...त्यांना हें जग मेलं !!...

पण मग त्या साऱ्यांना सहज जगतां आलं असतं;..हो,...

त्यांनीही जगायला हवं होतं!–जगांत जगायचा त्यांनाहि हक्क होता;—त्या सर्वांनी सर्वांसह निरुपद्रवी निरामय जीवन जगणं ...यांतच खरी खुरी मानवता नव्हती का सांठवलेली?..

...तसं घडलं मात्र नाही..दुर्दैव नरांचं!..म्हणूनच तसं विपरीत घडलं...ते गेले!!-स्वार्थी, दांभिक, पिसाट, नीच मानवानें त्यांना..त्यांच्या जगाला..(पर्यायानें आपल्याहि जगाला) जाणून बुजून ठार मारलं!!–

११

**पण जीवा–**

—तूं मात्र आजहि..अजूनही...जिवंत आहेस!–

कारण तुझं रक्त तूं सांडवलं नाहीस;..तुझं रक्त दुसऱ्याहि कोणी सांडवलं नाहीं!...

हा कसला तुझा पुरुषार्थ का?...नव्हे!... पण तो तुझा कसला कालिमाहि नव्हे!!–आज तूं जिवंत आहेस!...केवळ योगायोग हा!!—

कांहीं असलं तरी तुझ्यासारख्या कोणाहि सामान्य मानवाला.. शक्य तों, दुसऱ्याचं रक्त मात्र सांडवायला नको असतं...नको आहे!- तसा प्रसंग पडला तर स्वतःचंच रक्त..दुसऱ्याचं नव्हे!-

पण तें घडलं नाही म्हणून...(त्या लाखांचं रक्त सांडलं



तेवढ्यात काळांत)...तुझ्या हातून एवढी शाई मात्र सांडली!- रक्त नाही.. रक्ताळ शाई तरी!—तीहि सहजगत्या...वेळोवेळीं मनाला वाटलं म्हणून!– निष्क्रीय प्रवाह-पतिततेंत दुबळ्या मनाला विरंगुळा वाटावा म्हणून!—

१२

**माझ्या जीवा–**

—त्या त्या वेळीं तूं सांडलेल्या त्या रक्ताळ शाईकडेहि पाहायला तूं अजून जिवंत आहे!.. समाधान मान!...

आणि म्हणूनच..तीहि पुरी पुसटली जाण्यापूर्वी (तिच्याकडे एकतरी ओझरता दृष्टिक्षेप टाकायला समर्थ असलेल्या) तुझ्या-सारख्याच व तुझ्याइतक्याच आजहि जिवंत असेलल्या... तुझी मायबोली बोलणाऱ्या... इतर जित्या जीवांस—

—त्या मृत जीवांची नि गत काळाची स्मृति तरी राहावी म्हणून—

...तूं दिलेली ही रक्ताळ शाई...रक्त नि...शाई—

कार्तिकी एकादशी }
१८६९ }

[–विश्रांति–]

## —काळ बदलत आहे—

बदलत्या काळांत—

आपली दृष्टी अद्यतन नि निरोगी ठेवा!

—R. N. Shinde & Sons—

Bombay 4. ] : : [ Parel; Dadar.

आपली सर्वांगीण व चोख सेवा करतील.

बदलत्या काळांत—

आपला प्रत्येक क्षण कसोशीनें वापरा.

**❀ श्री समर्थ वॉच कं. ❀**

[ सरकारी तबेला; गिरगांव, मुंबई ४ ]

यांचीं घड्याळें क्षणाक्षणाचें चोख मोजमाप ठेवतील.

बदलत्या काळांत—

नित्य निरोगी नि कार्यक्षम असलें पाहिजे!

आपल्या सर्वसामान्य प्रकृतिस्वास्थ्यासाठीं

अनुभवानें गुणकारी ठरलेला

**पर्ल--काढा**

[ पर्ल कंपनी—भायखळा ]

## —नव्या वर्षाच्या नोंदी—

आपल्या व आपल्या प्रिय सुहृदांच्या घरकुलांत—

* आपल्या आपुलकीची आठवण—
* आपल्या तळमळीची जाणीव—
* सप्रेम भेटीतील जिवंतपणा —
* स्मृति-विस्मृतींची कलापूर्ण प्रतीकें-

— हलुवार आस्थेनें तयार करणारे-

महाराष्ट्राचे एकमेव गृहभूषा-तज्ञ कलावंत

**के. आठल्ये**

पेन्टर्स

गिरगांव-नाका

मुंबई-४.

* एक वेळ प्रचीति म्हणजेच सदाची खात्री! *

कोठेंहि कोणतेंहि औषध

खात्रीचें व किमान किंमतींत

निश्चितपणें मागवण्याचें

मुंबई मधील

जुन्यांत जुने व नव्यांत नवें

— विश्वासाई स्थळ —

**माधव एजन्सी**

मॅजेस्टिक सिनेमा नजीक

गिरगांव—मुंबई ४.

## वाङ्मय-निरोगी मनाचें अन्न !

मनानें आजच्या जगापुढें पोंहोचण्यासाठीं—
विविध अव्वल दर्जाचे देशी-परदेशी ग्रंथ
*सर्व भाषा *सर्व ग्रंथकार *सर्व विभाग
आपली व्यक्तीगत आवड-निवड खुलासेवार कळवा.

**बॉम्बे बुक डेपो लि० (मुंबई ४.)**

आपली कोणतीहि गरज ते आस्थेनें पुरवतील.

बाल-मनाच्या विकासासाठीं—
—पाडव्यापासून सुरु होणारी

**बा ल - बो ध - मा ला**

माहिती पत्रक मागवा; ग्राहक व्हा. लिहा—

**महाराष्ट्र-ग्रंथ-भांडार लि० मुंबई ४**

शाळकरी मुलांच्या नव्या-जुन्या पुस्तकांच्या छोट्या-मोठ्या गरजा माफक दरांत भागविणारा.

मुलांचा प्रिय

**र त्ना गि री बु क डे पो**

पांडुरंग वाडी-मुंबई ४

रघुवीर सामंत

— संपादित —

अमर ज्योति
वाङ्मय

आपल्या वाढत्या बाळांच्या हातीं द्या !